दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार
बैल पोळा च्या हार्दिक शुभेच्छा !
संपादक (विकास) : श्याम पेठकर   संचालक-संपादक : अजय बिवडे
Reg. No : MHBIL/25/A4140   Mail Id : sinhvanivrutta@gmail.com   दिनांक : गुरूवार, १० सप्टेंबर २०२६   Epaper : epaper.sinhvani.com   पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७१ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटिंग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटिंग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८६६६
९६५७२३२०२६

# मराठा आंदोलक आक्रमक, राधाकृष्ण विखे पाटलांचे बॅनर फाडले

## जरांगे पाटलांचाही सरकारला इशारा

**वृत्तसंस्था, नांदेड**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी आमरण उपोषण सुरू असून त्यांच्या उपोषणाचा आज १२ दिवस आहे. मात्र, सरकारसोबतची त्यांची बोलणी फिस्कटल्याचं दिसून आलं. आपण जरांगे पाटलांच्या १२ मागण्या मान्य केल्याचं सरकारने म्हटलं. मात्र, एकही मागणी मान्य न केल्याचे सांगत जरांगे पाटील यांनी मंत्र्यांच्या एकेरी उल्लेख केल्यावरुन मंत्री उदय सामंत यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दुसरीकडे मराठा आरक्षण उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी, आता सरकारचे शिष्टमंडळ जरांगे पाटलांच्या भेटीसाठी जाणार नसल्याचे म्हटले. त्यानंतर, मराठा समाज आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. मनोज जरांगेंच्या नेतृत्वात राज्यभरात मराठा समाज आक्रमक होत असून ठिकठिकाणी आंदोलन, रास्ता रोको करण्यात येतय. जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य करण्याची मागणी देखील केली जात आहे. दरम्यान, नदिडच्या हदगांव तालुक्यातील मराठा समाज आज आक्रमक झालाय,



सकाळी रास्ता रोको केल्यानंतर आंदोलकांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे बॅनर फाडले आहेत. सकल मराठा समाजाच्या आंदोलकांनी संतप्त होत हे बॅनर फाडून टाकले आहेत. आधी मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न सोडवा त्यानंतरच बॅनर बाजी करा असी मागणी कार्यकर्त्यांनी केलीय.

**चांदवडमध्ये आंदोलन, मराठ्यांचा रास्ता रोको**
नाशिक जिल्ह्यातील चांदवडमध्ये सकल मराठा समाजाच्या वतीने मनमाड-गनूर चौफुलीवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकारचा निषेध करत एक मराठा, लाख मराठाच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. येत्या दोन दिवसात संपूर्ण मागण्या मान्य न झाल्यास चांदवड तालुक्यातील मराठा बांधव मुंबईच्या दिशेने कूच करतील, असा इशाराही सकल मराठा समाजाच्यावतीने देण्यात आला. माजी आमदार शिरीष कोतवाल, डॉ. आत्माराम कुंभार्डे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख विलास भवर यांच्यासह मोठ्या संख्येने मराठा बांधव आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**सण-उत्सव आहेत, आंदोलन स्थगित करावे - सामंत**
संवाद गरजेचा आहे, आणि आमच्या नेतृत्वाला वाईट बोलू नये हे आम्ही संयमाने सांगतो. मनोज जरांगे पाटील यांना गैरसमज नाही, त्यांना कुणीतरी सांगतं आणि नंतर होतो असे आम्हाला वाटते. उद्या पोळा सण आहे, मराठवाड्यात दुष्काळ आहे, राज्यात गणेशोत्सव आहे. त्यामुळे, आंदोलनाला स्थगिती द्यावी ही विनंती आहे, असेही सामंत यांनी म्हटले. जरांगे पाटील आक्रमक आहेत तर आम्ही सरकार आहोत, मायबाप आहोत, संयम आमच्या पाचवीला पुजला आहे. आम्हला संयमीच बोलावे लागेल. आम्ही त्यांना अभ्यासक पाठवा आवाहन केले, आता ते आले नाही तर काय करावे, असा सवालही सामंत यांनी विचारला.

## थोडक्यात

### एमपीएससीचा मोठा निर्णय! गट-क संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलली

**वृत्तसंस्था, मुंबई**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी प्रसिद्ध केली आहे. आयोगाने महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ ही परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी ही परीक्षा २५ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित केली जाणार होती. मात्र, आता नव्या वेळापत्रकानुसार ही परीक्षा ३ जानेवारी २०२७ रोजी राज्यातील सर्व जिल्हा केंद्रांवर पार पडेल.

### मसूद अझहर अफगाणिस्तानात नाही

**काबुल :** जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या व मुंबईवरील हल्ल्याच मास्टरमाईंड मसूद अझहर अफगाणिस्तानात लपून कारवाया करत असल्याचा पाकिस्तानचा दावा तालिबानने पूर्णपणे फेटाळून लावला आहे. अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, मसूद अझहर अफगाणिस्तानमध्ये नसून आमच्या भूमीचा वापर इतर कोणत्याही देशाविरुद्ध दहशतवादी कारवायांसाठी होऊ दिला जाणार नाही, असा पुनरुच्चारही केला आहे.

## पुण्यात २१ वर्षीय शिकाऊ डॉक्टर तरुणीने संपवले जीवन

**वृत्तसंस्था, पुणे**
पुण्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. पुण्यातील कात्रज परिसरात राहणाऱ्या एका २१ वर्षीय शिकाऊ डॉक्टर तरुणीने इमारतीच्या नवव्या मजल्यावरून खाली उडी मारून आपले आयुष्य संपवलं. माया रेड्डी असे या शिकाऊ डॉक्टर तरुणीचे नाव आहे. या अचानक घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे कात्रज परिसर आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माया ही मूळची तेलंगणातील हैदराबाद येथील रहिवासी होती. ती वैद्यकीय उच्च शिक्षणासाठी पुण्यात राहत होती. पुण्यात कात्रज परिसरातील 'भारती विद्यापीठ' वैद्यकीय महाविद्यालयात ती एमबीबीएसच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती. अभ्यासासाठी ती कात्रज भागातील एका उच्चभ्रू गृहनिर्माण संस्थेत (सोसायटी) वास्तव्यास होती.बुधवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास माया रेड्डी हिने आपल्या राहत्या इमारतीच्या नवव्या मजल्यावरून अचानक खाली उडी मारली.

उंच मजल्यावरून खाली पडल्याने तिला अत्यंत गंभीर दुखापत झाली. मोठा आवाज झाल्याने सोसायटीतील नागरिक आणि सुरक्षारक्षक घटनास्थळी धावले. त्यांनी तात्काळ तिला वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात नेले, मात्र गंभीर दुखापतींमुळे उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## गणेशोत्सवावर महागाईचे सावट, डेकोरेशन साहित्याच्या किमतीत २० ते ३० टक्के वाढ

**वृत्तसंस्था, पुणे**
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाप्पाच्या आराससाठी यंदा पारंपरिक सजावटीसोबत आधुनिक डेकोरेशनला पसंती मिळत आहे. आकर्षक कागदी मंदिरे आणि विविध प्रकारच्या एलईडी लायटिंगला ग्राहकांकडून मागणी वाढली आहे. यंदा वाढत्या महागाईमुळे बाप्पाची आरास सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लावणार आहे. डेकोरेशन साहित्याच्या किमतीत २० ते ३० टक्के वाढ झाली आहे.गणरायाच्या आगमनाची तयारी सुरू झाली असून, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या आरास सजावटीसाठी आधुनिक साहित्याला यंदा ग्राहकांची विशेष पसंती मिळत आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत सजावटीच्या साहित्याच्या दरात २०-३० टक्क्यांहून अधिक वाढ



झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल साहित्याबरोबरच कापड, प्लास्टिक आणि इतर कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने सजावटीच्या वस्तू महागल्याचे जुने नाशिकमधील होलसेल सजावट साहित्य विक्रेत्यांनी सांगितले.

यंदा थ्रीडी फोल्डेबल मखर, मखमली मखर, कागदी व पुठ्ठ्याचे रेडिमेड मंदिर, विविध धार्मिक व ऐतिहासिक थीमचे बॅकड्रॉप, गोवर्धन पर्वत, राम मंदिर तसेच शिवकालीन गड-किल्ल्यांच्या प्रतिकृतींना मागणी आहे. कमी जागेत सहज बसणारे आणि वापरल्यानंतर साठवून ठेवता येणारे फोल्डेबल मखर ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. सजावटीमध्ये एलईडी चक्र, लायटिंग तोरण, मल्टीकलर लाईट्स, लेझर लाईट्स, फेरी लाईट्स आणि डिजिटल लाइटिंग बॅकड्रॉप यंदाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. पारंपरिक सजावटीसोबत कृत्रिम झेंडूच्या माळा, मोगऱ्याच्या कळ्यांचे लटकन, विविध रंगांच्या कापडी व प्लास्टिकच्या वेली यांनाही मागणी वाढली आहे.

**कापडी बॅकड्रॉप, रेडिमेड मंदिराला मागणी**
गणेशभक्तांकडून कमी खर्चात आकर्षक आरास करण्याला प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे तयार सजावटीचे किट, कागदी मखर, कापडी बॅकड्रॉप आणि रेडिमेड मंदिराच्या डिझाईनला चांगली मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

## दहशतवादाशी संबंधित असल्याने अमेरिकन नागरिकाला अटक

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) मंगळवारी अमेरिकन नागरिक मैथ्यू वॅन डाइक याच्याविरोधात दिल्लीतील राऊज अव्हेन्यू न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. मात्र, अटकेच्या वेळी दहशतवादाशी संबंधित गंभीर आरोप करण्यात आले असतानाही आरोपपत्रात त्यावर बेकायदा कारवाया प्रतिबंधक कायदा लावण्यात आलेला नाही. यावर काँग्रेसने मोदी सरकारवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

काँग्रेसचे राज्यसभा खासदार अभिषेक मनु सिंघवी यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे म्हटले की, अमेरिका आणि भारत दरम्यान झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर मैथ्यू वॅन डाइकवरील दहशतवादाशी संबंधित आरोप मागे घेण्यात आल्याच्या बातम्या खऱ्या असतील, तर मोदी सरकारने देशाला याबाबत स्पष्टीकरण द्यावे. एखाद्या व्यक्तीला बेकायदा प्रवेश, सशस्त्र गटांशी संबंध आणि ड्रोन युद्धाचे प्रशिक्षण घेतल्याच्या आरोपांवर अटक करण्यात आली असेल, तर हे गंभीर आरोप अचानक कसे संपुष्टात आले? असा सवाल सिंघवी यांनी केला.

वॅन डाइकला याच वर्षी मार्चमध्ये कोलकाता विमानतळावर ताब्यात घेण्यात आले होते, तर सहा युक्रेनियन नागरिकांना दिल्ली आणि लखनौ विमानतळावरून पकडण्यात आले होते.

अटकेनंतर सुमारे सहा महिन्यांनी एनआयएने आरोपपत्र दाखल केले आहे. वॅन डाइक आणि सहा युक्रेनियन नागरिकांवर म्यानमारमधील बंडखोर गटांना लष्करी तसेच ड्रोन प्रशिक्षण देण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. ठकअने सुरुवातीला या सर्वांविरोधात यूएपीएच्या कलम १८ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाची सुनावणी करण्यासाठी राऊज अव्हेन्यू न्यायालयाने १ ऑक्टोबर ही तारीख निश्चित केली आहे.

# आरएसएस कार्यालयावर युवक काँग्रेसचा मोर्चा

## मनुस्मृतीची प्रत जाळून निषेध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मनुस्मृतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने बुधवारी नागपुरात संविधान सन्मान यात्रा काढली. आक्रमक घोषणाबाजी करीत कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीची प्रत जाळून निषेध नोंदविला. संविधानाच्या मूल्यांच्या समर्थनार्थ आणि सामाजिक समतेचा संदेश देण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेली संविधान सन्मान यात्रा एनआयटी कर्मचारी सांस्कृतिक भवन, एस. डी. हॉस्पिटलसमोर, ग्रेट नाग रोड येथून सुरू झाली. तेथून ही यात्रा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रेशीमबागेतील हेडगेवार स्मृती भवन परिसरातील कार्यालयाच्या दिशेने नेण्यात आली. मनुस्मृतीच्या निषेधार्थ आयोजित या आंदोलनात युवक काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यात्रेदरम्यान कार्यकर्त्यांनी हातात संविधान आणि विविध फलक घेत मनुस्मृतीविरोधात घोषणाबाजी केली. सामाजिक समता, संविधानाचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून गेला. आरएसएस कार्यालयाच्या दिशेने मोर्चा नेण्यात आल्याने रेशीमबाग परिसरात काही काळ राजकीय वातावरण तापले.

आंदोलनादरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीची प्रत फाडली. त्यानंतर तिची प्रत जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. मनुस्मृतीतील सामाजिक विषमतेला प्रोत्साहन देणाऱ्या विचारांना विरोध करणे आणि संविधानाने दिलेल्या समता व सामाजिक न्यायाच्या अधिकारांबाबत जनजागृती करणे, हा आंदोलनाचा उद्देश असल्याचे युवक काँग्रेसकडून





सांगण्यात आले. संविधानाच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला समान अधिकार मिळाले असून, संविधानाच्या मूल्यांवर कोणत्याही प्रकारे गदा येऊ नये, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी मनुस्मृतीच्या विचारसरणीला विरोध करत संविधानाच्या मूल्यांचा प्रसार करण्याची गरज व्यक्त केली.महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे आणि प्रदेश सहप्रभारी नवज्योत सिंग संधू यांच्या प्रमुख उपस्थितीत ही यात्रा काढण्यात आली. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी संविधानातील समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांच्या समर्थनार्थ आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. युवक काँग्रेसच्या माध्यमातून राज्यभर संविधानाच्या मूल्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. युवकांनी संविधान समजून घेऊन त्यातील मूलभूत मूल्यांच्या रक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

संविधान सन्मान यात्रेद्वारे माध्यमातून संविधानाचा सन्मान आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा युवकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मनुस्मृतीच्या निषेधासोबतच संविधानाच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव अक्षय अरुण हेटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मनुस्मृतीच्या निषेधार्थ आणि संविधानाच्या सन्मानार्थ ही यात्रा आयोजित करण्यात आली. संविधानाच्या मूल्यांबाबत युवकांमध्ये जागृती निर्माण करणे हा उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार

**वृत्तसंस्था, मुंबई**
ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले असून महागाईची झळ सोसावी लागत आहे. अशातच साखरेच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकार विविध स्तरांवर उपाययोजना करत आहे. साखरेचे दर अचानक वाढल्यामुळे ग्राहकांना मोठा फटका बसत आहे. दरम्यान, वाढत्या साखरेच्या दराच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेतल्याची माहिती आहे. दरम्यान, सह्याद्री अतिथिगृह येथे विविध कारखान्यांच्या संघटनांचे प्रतिनिधी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यासह विविध आमदारांच्या बैठकीत या संदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे.

देशात साखरेचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यामुळे किरकोळ बाजारात साखरेच्या दराने उसळी घेतली होती. ऑगस्टमध्ये साखरेचे दर ७० ते ७५ रुपये किलोवर गेल्याचे पहायला मिळाले होते. तर नोव्हेंबरपूर्वी गळीत हंगाम सुरू करणे शेतकरी आणि कारखान्यांच्या तोट्याचे असल्याची कारखानदारांनी भूमिका घेतली होती. अशातच आता या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी मोठा निर्णय घेत राज्याचा साखर हंगाम यंदा १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार असल्याची माहिती आहे.

साखरेच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांना सणावाराला महागाईचे चटके सहन करावे लागत आहेत. गणेशोत्सव तोंडावर आला असताना साखरेसह दूध, डाळींची दरवाढ झाली आहे. गणेशोत्सवानंतर नवरात्र, दसरा-दिवाळी असा सणांचा सिझन समोर आहे. त्यामुळे साखरेचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी उसाचा गाळप हंगाम महिनाभर आधी सुरू करण्याचा निर्णय सरकार घेऊ शकते. मात्र याला शेतकरी आणि कारखानदारांनी विरोध दर्शवला आहे. रोजच्या स्वयंपाकापासून ते मिठाईपर्यंत, सर्वत जास्त आवश्यक गोष्ट म्हणजे गोडी वाढवणारी साखर. मात्र, ऐन सणासुदीला साखर महाग झाल्यामुळे सर्वसामान्यांच्या पाकिटावर ताण येतोय. त्यातच सणांचा राजा दिवाळी जवळ येत असताना सरकारला साखरटंचाईची भीती जाणवू लागली आहे. त्यामुळे यंदा उसाचा गाळप हंगाम लवकर सुरू करण्याचा सरकारच्या विचाराधीन आहे.

संपादकीय लेखणीतून...

# इस्त्रोचे खासगीकरण नाही

अंतराळ क्षेत्र खासगी उद्योगांसाठी खुले करण्याच्या सरकारच्या धोरणाविरोधात भारतीय अवकाश संशोधन संस्था 'इस्त्रो'च्या नऊ कर्मचारी संघटनांनी इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांना पत्र पाठवून खासगी क्षेत्रासोबतच्या वाढत्या भागीदारीबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. या पत्रात संघटनांनी आपल्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त करत संशोधन व विकास संस्था म्हणून इस्त्रोचे स्वरूप बदलण्याच्या कोणत्याही धोरणाला कर्मचाऱ्यांचा विरोध राहील असा इशारा दिला आहे. भारत सरकारने सहा वर्षांपूर्वी अंतराळ क्षेत्र खासगी उद्योगांसाठी खुले केले. त्यानंतर अनेक खासगी कंपन्या या व्यवसायात उतरल्या. यातील स्कायरूट एरोस्पेस या खासगी कंपनीने १९ जुलै रोजी विक्रम-१ या पहिल्या रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपणही केले. २०२० मध्ये पंतप्रधानांनी अंतराळ क्षेत्रात खासगी सहभागाला चालना देण्यासाठी स्थापन केलेल्या भारतीय राष्ट्रीय अंतराळ प्रोत्साहन आणि प्राधिकरण क्षेत्राचे (इनस्पेस) अध्यक्ष पवन गोएंका यांनी काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात याचे सूतोवाच केले. ते म्हणाले की, इस्त्रो यापुढे अखेरच्या टप्प्यावर कोणतेही प्रक्षेपण वाहन तयार करणार नाही. हे काम खासगी क्षेत्र किंवा सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडून केले जाईल. इस्त्रो दररोजच्या वापरासाठी लागणारे उपग्रहही तयार करणार नाही. इस्त्रो फक्त वैज्ञानिक संशोधनासाठी किंवा विशिष्ट उद्देशांसाठी, नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी आवश्यक असलेले उपग्रह तयार करेल. त्यानंतर ते तंत्रज्ञान खासगी क्षेत्राकडे हस्तांतरित केले जाईल. लघु उपग्रह प्रक्षेपक वाहनापासून या प्रक्रियेची सुरुवात आधीच झाली असून, लवकरच ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक आणि एलव्हीएम-३ सारख्या प्रमुख प्रक्षेपकांचे कामही बाहेर दिले जाण्याची शक्यता आहे.या वक्तव्यामुळे चिंतीत झालेल्या कर्मचारी संघटनांनी इस्त्रोचे प्रमुख व्ही. नारायणन यांना पाठवलेल्या पत्रात असा दावा केला आहे की, गोएंका यांच्या वक्तव्यानंतर अंतराळ विभागाकडून या धोरणाचे स्वरूप, त्याचा कायदेशीर आधार, अंमलबजावणीची कालमयार्दा किंवा विद्यमान कर्मचारी आणि भविष्यातील भरतीवर होणारा परिणाम स्पष्ट करणारे कोणतेही पत्रक किंवा निवेदन जारी करण्यात आलेले नाही. इस्त्रोची सार्वजनिक संस्था म्हणून भविष्यातील भूमिका काय असेल, उत्पादन क्षेत्रातील कामामधून सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनाही वगळले जाणार आहे का, विद्यमान कर्मचाऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कोणत्या उपाययोजना आहेत आणि सार्वजनिक निधीतून विकसित केलेले तंत्रज्ञान खासगी कंपन्यांकडे कशा पद्धतीने हस्तांतरित केले जात आहे, संस्थेची रचना, कार्यक्षेत्र किंवा कर्मचारी संख्येवर परिणाम करणारा कोणताही निर्णय अंतिम करण्यापूर्वी कर्मचारी संघटनांशी सल्लामसलत केली जाणार आहे का, असे अनेक प्रश्नही पत्रात उपस्थित करण्यात आले आहेत. आतापर्यंत इस्त्रोने विकसित केलेले सुमारे १२० प्रकारचे प्रगत तंत्रज्ञान खासगी उद्योगांकडे सोपवण्यात आल्याचा दावा करत संघटनांनी पत्रात म्हटले आहे की, खासगी कंपन्यांचा सहभाग इस्त्रोसोबत सहअस्तित्वापुरता असू शकतो.

परंतु प्रक्षेपण यान उत्पादन आणि प्रक्षेपण पायाभूत सुविधा यासारख्या संस्थेच्या मुख्य क्षमता संस्थेबाहेर हस्तांतरित कशा होऊ शकतात? इस्त्रो संशोधनापुरती ठेवली जाणार आहे का? इस्त्रोच्या १०० कर्मच्चैयांनी काही दिवसांपूर्वी राजीनामा दिला तेव्हा बरीच खळबळ माजली होती. कर्मचारी संघटनांच्या पत्रावर अधिकृत स्पष्टीकरण देताना इस्त्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी म्हटले आहे की, भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोचे खासगीकरण केले जाणार नाही. देशाच्या अंतराळ मोहिमांमधील या संस्थेचे महत्त्व कुठेही कमी होणार नाही. खासगीकरणाच्या मुद्यावर कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन केले जाईल. इस्त्रोचे खासगीकरण झालेले नाही, ती एक सरकारी संस्थाच आहे. तरीदेखील माज्या सहकाऱ्यांनी व्यक्त केलेली चिंता रास्त आहे. त्याबाबत स्पष्टीकरण देणे ही आमची जबाबदारी आहे असे नारायणन यांनी म्हटले आहे. प्रगत तंत्रज्ञान, मानवी अंतराळ मोहीम, अंतराळ आणि ग्रहांच्या शोध मोहिमा तसेच धोरणात्मक राष्ट्रीय क्षमता यासारख्या वैज्ञानिक कौशल्याच्या क्षेत्रामध्ये इस्त्रोची भूमिका अधिक मजबूत केली जाईल असे आश्वासन नारायणन यांनी दिले आहे.

# काशिनाथ त्र्यंबक तेलंग

(३० ऑगस्ट, इ.स. १८५० - १ सप्टेंबर, इ.स. १८९३) हे ब्रिटिश भारतातील न्यायाधीश, मराठी लेखक-संपादक, व सुधारक होते. ते इ.स. १८८५-८९ या कालखंडात अखिल भारतीय काँग्रेसचे चिटणीस होते. इ.स. १८८९ साली तेलंग मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले, तर इ.स. १८९२ साली मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले.काशिनाथ तेलंग यांचा जन्म ३० ऑगस्ट, इ.स. १८५० रोजी गोकुळाष्टमीच्या दिवशी एका मध्यमवर्गीय सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. काशिनाथ यांच्या जन्मदात्या वडिलांचे नाव बापूभाई होते. त्यांना कृष्णराव व काशिनाथ ही दोन मुले होती. परंतु बापूभाई यांच्या मोठ्या बंधूंना-त्र्यंबक तेलंग यांनी मूलबाळ नव्हते. म्हणून त्यांनी काशिनाथ यांना दत्तक घेतले. वयाची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर काशिनाथ एका स्थानिक शाळेत जाऊ लागले. ते सुरुवातीला दिनकरपंत दाते यांच्या व नंतर महादेव पंतोजी यांच्या शाळेत जाऊ लागले. लहानपणापासूनच ते हुशार विद्यार्थी होते. काशिनाथ यांचे मराठी शिक्षण पूर्ण झाल्यावर ते नवव्या वर्षी एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये इंग्रजी विषय शिकण्यासाठी जाऊ लागले.

शालेय जीवनात शैक्षणिक पुस्तकांशिवाय ते अवांतर पुस्तके देखील वाचत असत. इ.स. १८६१ मध्ये मिडल स्कूलच्या परीक्षेत, इंग्लिश भाषेत त्यांनी प्रावीण्य मिळवले. त्यांची हुशारी पाहून मुख्याध्यापक एडमंड बर्क यांनी काशिनाथ यांना इंग्रजी तिसरीतून पाचवीच्या वर्गात चढवले. शालेय जीवनातच त्यांना मराठी कवितेची गोडी लागली. संस्कृत शिकण्यासाठी ते व त्यांचे वर्गमित्र श्रीपाद ठाकूर यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री सुरतकर यांच्याकडे जाऊ लागले. शाळेत इंग्रजी व संस्कृत हे दोन विषय त्यांचे उत्तम होते. इ.स. १८६४ साली काशिनाथ संस्कृत विषय घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. संस्कृत ही भाषा घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेले काशिनाथ व श्रीपाद ठाकूर हे पहिले विद्यार्थी होते. एल्फिन्स्टन हायस्कूलचे तत्कालीन मुख्याध्यापक मिस्टर जेफ्रेसन यांनी काशिनाथांना मॅक्स मुल्लरचे 'संस्कृत वाङ्मयाचा इतिहास' हे पुस्तक बक्षीस म्हणून दिले.

इ.स. १८६५मध्ये पुढील शिक्षणासाठी काशिनाथ एल्फिन्स्टन महाविद्यालयात जाऊन लागले. पहिल्याच वर्षी त्यांना जुनियर स्कॉलरशिप व त्याच्या पुढच्या वर्षी त्यांना सिनियर स्कॉलरशिप मिळू लागली. इ.स. १८६७मध्ये ते बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले व इ.स. १८६९मध्ये इंग्रजी व संस्कृत विषय घेऊन एम.ए. झाले. याच वर्षी ते एल.एल.बी.ची परीक्षा देखील उत्तीर्ण झाले.

# रमाबाईची 'मॅरेथॉन' आणि सरन्यायाधीशांचे दातृत्व!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

मुलींच्या उच्च शिक्षणासाठी आणि पुस्तकांच्या पैशांसाठी महाराष्ट्रातील बीड (अंबाजोगाई) येथील ४७ वर्षीय रमाबाई रणवीर (रणसिंग) यांनी चक्क अनवाणी पायांनी आणि साडी नेसून मॅरेथॉनमध्ये धाव घेतली आणि ती जिंकलीसुद्धा. एका आईच्या या अद्भुत संघर्षाची आणि जिद्दीची दखल थेट भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी घेतली असून त्यांनी रमाबाईंच्या मुलींच्या शिक्षणासाठी भरीव मदत जाहीर केली आहे.

आई आपल्या मुलांच्या भविष्यासाठी कोणत्याही संकटाचा सामना करू शकते आणि कितीही मोठा संघर्ष उभा करू शकते, याचा प्रेरणादायी प्रत्यय बीडच्या रमाबाई रणसिंग यांनी दिला आहे. आपल्या लेकीच्या शिक्षणासाठी निधी उभा करण्याच्या उद्देशाने त्यांनी थेट मॅरेथॉनमध्ये धाव घेतली. त्यांच्या या अफाट जिद्दीची आणि संघर्षाची दखल आता थेट देशाच्या सरन्यायाधीशांनी घेतली आहे.रमाबाईंच्या या धडपडीची माहिती सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचल्यानंतर,

न्यायव्यवस्थेनेही त्यांच्या या मातृत्वाला आणि जिद्दीला सलाम केला आहे. त्यांच्या मुलीच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाकडून रमाबाईंना मदतीचा हात देण्यात आला आहे. यामुळे त्यांच्या लेकीच्या उज्ज्वल भविष्याचा मार्ग आता अधिक सुकर झाला आहे.

बीड जिल्ह्यातील रमाबाई रणसिंग या एका सामान्य कष्टकरी मातेने आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी थेट मॅरेथॉनमध्ये घेतलेली धाव ही केवळ एक क्रीडाविषयक घटना राहिलेली नाही. ती भारतीय समाजव्यवस्थेतील आर्थिक विषमता आणि तळागाळातील वर्गाच्या जगण्याच्या संघर्षावर टाकलेला एक प्रखर प्रकाशझोत आहे. आपल्या लेकीच्या शिक्षणात कोणताही आर्थिक अडथळा येऊ नये आणि तिच्या भविष्यासाठी निधी उभा करता यावा, या एकाच उद्देशाने त्यांनी ही शर्यत पूर्ण केली. शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या आजच्या काळात, जेथे सामान्य माणसाला दर्जेदार शिक्षण मिळवणे हे एक मोठे आव्हान बनले आहे, तिथे एका आईने आपल्या लेकीच्या भवितव्यासाठी उभा केलेला हा लढा अत्यंत अभ्यासपूर्ण आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करायला लावणारा आहे. ही धाव केवळ पदकासाठी किंवा वैयक्तिक विक्रमासाठी नव्हती, तर ती गरिबीचे दुष्टचक्र भेदून आपल्या पुढच्या पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुकारलेला एक शांत आणि अभेद्य लढा होता.

या घटनेचा दुसरा आणि तितकाच ऐतिहासिक पैलू म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेने या संघर्षाची घेतलेली थेट दखल होय. भारताचे सरन्यायाधीश आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांनी रमाबाईंच्या या धडपडीला सलाम करत जो संस्थात्मक मदतीचा हात दिला, तो लोकशाही व्यवस्थेतील संवेदनशीलतेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. भारतीय संविधानाने अनुच्छेद २१(अ) अन्वये शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार मानला आहे. मात्र, तळागाळातील अनेक घटकांसाठी हा अधिकार अनेकदा कागदावरच राहताना दिसतो. अशा परिस्थितीत, जेव्हा सर्वोच्च न्यायालयासारखी न्यायदायिनी संस्था एका सामान्य महिलेच्या वैयक्तिक संघर्षाची दखल घेऊन त्यांना आर्थिक आणि संस्थात्मक पाठबळ देते, तेव्हा तो केवळ एका कुटुंबाला मिळालेला न्याय नसून, संपूर्ण समाजव्यवस्थेचा लोकशाही मूल्यांवरील विश्वास दृढ करणारा क्षण ठरतो. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्याचे 'नालसा'चे उद्दिष्ट या कृतीतून खऱ्या अर्थाने सार्थ ठरले आहे.

समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांसाठी शिक्षण हे केवळ साक्षरतेचे माध्यम नसून, ते गरिबीचे आणि शोषणाचे चक्र तोडणारे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, याची तीव्र जाणीव रमाबाईंसारख्या कष्टकरी महिलांना असते. स्वतःच्या वाट्याला आलेले अफाट कष्ट, गरिबी आणि अज्ञान आपल्या मुलीच्या वाट्याला येऊ नये, ही एका आईची प्रामाणिक तळमळ असते. मुलीच्या हाती पाटी-पेन्सिल असावी आणि तिने स्वतःचे भविष्य स्वकर्तृत्वावर घडवावे, या उदात्त विचारातून रमाबाईंनी जी झेप घेतली, ती समाजातील अनेक शोषित वर्गांसाठी एक दिशादर्शक पाऊल ठरली आहे. हा प्रवास हे सिद्ध करतो की, जेव्हा एखादी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यासाठी उभी राहते, तेव्हा ती केवळ स्वतःच्याच नाही, तर संपूर्ण पिढीच्या उद्धाराचा पाया रचत असते.

मातृत्व हे केवळ मुलांचे संगोपन करण्यापुरते मर्यादित नसते; तर ते प्रसंगी मुलांच्या भविष्यासाठी डोंगर पोखरण्याची अफाट ताकद देते, हे रमाबाईंनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. जेव्हा आर्थिक परिस्थिती शिक्षणाच्या आड येते, तेव्हा समाजव्यवस्थेसमोर हतबल होऊन हार न मानता, उपलब्ध असलेल्या प्रत्येक संधीचे सोने करण्याची लढाऊ वृत्ती त्यांनी दाखवली. स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक योजना आणि धोरणे शासन स्तरावर राबवली जात असली, तरी तळागाळातील वास्तविकता बदलण्यासाठी अशा वैयक्तिक जिद्दीची आवश्यकता असते. त्यांची ही कृती हे स्पष्ट करते की, महिला या केवळ परिस्थितीच्या बळी नाहीत, तर त्या आपल्या आत्मविश्वासाच्या आणि कष्टाच्या जोरावर स्वतःचे आणि कुटुंबाचे भवितव्य बदलण्याची ताकद ठेवतात.

आजच्या काळात, जिथे शिक्षणाचे बाजारीकरण होत असल्याची ओरड होते, तिथे बीडच्या रमाबाईंसारख्या माता समाजाला एक स्वच्छ आरसा दाखवतात. आज रमाबाई रणसिंग या हजारो वंचित आणि शोषित महिलांसाठी एका आशेचा किरण बनल्या आहेत. खऱ्या अर्थाने, शिक्षणासाठी धावणारी ही आई आज हजारो-लाखो वंचित लेकींसाठी नवी 'हिरकणी' बनली आहे. न्यायव्यवस्थेने दिलेली संवेदनशील साथ आणि एका आईचा निस्वार्थ संघर्ष यांचा हा संगम भविष्यात अनेक वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहाकडे खेचून आणेल. हा लढा केवळ एका लेकीच्या शिक्षणाचा नसून, तो समाजातील प्रत्येक शेवटच्या घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या व्यापक प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग आहे.

- ९५६१५९४३०६

# जागतिक क्रिकेटमधील भारताचे निर्विवाद वर्चस्व

## आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अव्वल स्थानाचा प्रदीर्घ प्रवास आणि विश्लेषण

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) नवीनतम एकदिवसीय सांघिक क्रमवारीत भारतीय संघाने पुन्हा एकदा आपले अव्वल स्थान अत्यंत भक्कमपणे कायम राखले आहे. गेले ३५ महिने आणि १८ दिवसांहून अधिक काळापासून जागतिक क्रिकेटच्या सर्वोच्च शिखरावर विराजमान राहणे ही सामान्य कामगिरी नक्कीच नाही. आधुनिक क्रिकेटमधील प्रचंड स्पर्धा, खेळाचे बदललेले गतिशास्त्र आणि जगभरातील संघांमधील चुरस पाहता, एवढ्या प्रदीर्घ कालावधीसाठी आपले वर्चस्व अबाधित ठेवणे हे भारतीय क्रिकेटच्या सातत्य, कौशल्य आणि मानसिक दृढतेचे जिवंत प्रतीक ठरते. सप्टेंबर २०२३ मध्ये पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला मागे टाकत भारताने एकदिवसीय क्रमवारीत पहिले स्थान पटकावले होते; तेव्हापासून सुरू झालेला हा विजयरथ आजही अविरतपणे धावत आहे.

### जागतिक क्रमवारीत भारताचे स्थान आणि आकडेवारीचे सामर्थ्य

आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत भारतीय संघ ३,८४१ गुण आणि ११६ चे रेटिंग पॉईंट्स मिळवून पहिल्या स्थानावर ठामपणे उभा आहे. रेटिंगच्या बाबतीत भारताने आपल्या निकटच्या प्रतिस्पर्ध्यांवर घेतलेली आघाडी लक्षणीय आहे. न्यूझीलंडचा संघ १०९ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे, तर जागतिक क्रिकेटमध्ये सातत्याने आव्हान देणारे ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ प्रत्येकी १०२ रेटिंगसह अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहेत.

पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकाच्या संघामध्ये असलेला सात रेटिंग गुणांचा फरक आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या क्रमवारीत मोठा मानला जातो. हा फरक दर्शवतो की भारताने केवळ सामने जिंकलेले नाहीत, तर द्विपक्षीय मालिका आणि जागतिक स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण विजयांची मालिका रचून आपले मानांकन अत्यंत उंचावर नेऊन ठेवले आहे. तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावरील संघांशी भारताची तुलना केली, तर १४ गुणांचे अंतर भारतीय संघाच्या वर्चस्वाची स्पष्ट साक्ष देते.

### आशियाई आणि इतर प्रमुख क्रिकेट राष्ट्रांची स्थिती

जागतिक क्रमवारीत पहिल्या दहा संघांवर नजर टाकल्यास विविध खंडांतील क्रिकेटचा समतोल स्पष्ट होतो. आशियाई क्रिकेटचा विचार करता भारतापाठोपाठ पाकिस्तानचा संघ १०० रेटिंग गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. पाकिस्तानने ३२ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमधून ३,२१५ गुण संपादन केले आहेत. पाकिस्तानचा संघ नेहमीच अनपेक्षित कामगिरीसाठी ओळखला जातो, मात्र क्रमवारीत स्थिरावण्यासाठी आवश्यक असणारे सातत्य त्यांना राखता आलेले नाही.

श्रीलंकेचा संघ ९६ रेटिंग गुणांसह सहाव्या स्थानावर असून, ते आशियाई क्रिकेटमध्ये पुनरागमनासाठी धडपडत आहेत. दुसरीकडे अफगाणिस्तानच्या संघाने जागतिक क्रिकेटमध्ये घेतलेली झेप थक्क करणारी आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या या संघाने ९२ रेटिंगसह आठवे स्थान पटकावले आहे. त्यांनी इंग्लंडसारख्या दिग्गज संघालाही कडवे आव्हान दिले आहे.

क्रिकेटची जननी मानला जाणारा इंग्लंडचा संघ ९३ रेटिंगसह सातव्या स्थानावर फेकला गेला आहे. मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये आक्रमक क्रांती घडवणाऱ्या इंग्लंडच्या कामगिरीत गेल्या काही वर्षांत चढ-उतार पाहायला मिळाले आहेत. बांगलादेशचा संघ ८३ रेटिंगसह नवव्या स्थानावर असून, दोन वेळचा विश्वविजेता वेस्ट इंडिजचा संघ ७७ रेटिंगसह दहाव्या क्रमांकावर अडखळताना दिसतो. कॅरेबियन क्रिकेटची ही पीछेहाट जागतिक क्रिकेटसाठी चिंताजनक असली, तरी ती सध्याची वास्तव स्थिती दर्शवते.

### दुसऱ्या फळीतील असोसिएट राष्ट्रे आणि जागतिक विस्तार

आयसीसीच्या क्रमवारीतील पहिल्या दहा संघानंतरचे चित्र क्रिकेटच्या जागतिक प्रसाराची कथा सांगते. झिम्बाब्वेचा संघ ६३ रेटिंगसह अकराव्या स्थानावर आहे. आयर्लंड ५१ रेटिंगसह बाराव्या आणि स्कॉटलंड ४५ रेटिंगसह तेराव्या स्थानावर आहे. युरोपातील या दोन्ही संघांनी गेल्या काही वर्षांत कसोटी खेळणाऱ्या बड्या राष्ट्रांना अनेकदा पराभवाचा धक्का दिला आहे.

यांच्यानंतर नेदरलँड्स ४४ रेटिंगसह चौदाव्या, अमेरिका (युएसए) ४० रेटिंगसह पंधराव्या आणि नामिबिया ३१ रेटिंगसह सोळाव्या क्रमांकावर आहे. अमेरिकेतील क्रिकेटचा विकास अलीकडच्या काळात वेगाने होत असल्याचे या क्रमवारीत दिसून येते. त्यानंतर आशियातील उदयोन्मुख संघ ओमान ३० रेटिंगसह सतराव्या, नेपाळ २५ रेटिंगसह अठराव्या, संयुक्त अरब अमिराती (युएई) १९ रेटिंगसह एकोणिसाव्या आणि कॅनडा ९ रेटिंगसह विसाव्या क्रमांकावर आहे.

या क्रमवारीत आयर्लंडच्या संघाचा उल्लेख विशेषत्वाने करावा लागेल. आयर्लंडला आजवर एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात भारताला कधीही पराभूत करता आलेले नाही. मात्र, छोट्या फॉरमॅटमध्ये त्यांनी आपल्या क्षमतेची चुणूक दाखवून दिली असून भारताला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पराभूत करत ऐतिहासिक मालिका विजय नोंदवला आहे. हा विजय दर्शवतो की असोसिएट राष्ट्रे आणि प्रमुख राष्ट्रांमधील अंतर तंत्र आणि धोरणांच्या पातळीवर हळूहळू कमी होत चालले आहे.

### ऐतिहासिक वळण: महेंद्रसिंग धोनी आणि २०१३ चा पाया

भारतीय संघाने एकदिवसीय क्रमवारीत नंबर-१ बनण्याचा हा प्रवास एका रात्रीत घडलेला नाही. या यशाची बीजे भूतकाळातील ऐतिहासिक विजयांमध्ये रोवली गेली होती. जानेवारी २०१३ मध्ये महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने पहिल्यांदाच आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत अधिकृतपणे जगातील अव्वल संघ बनण्याचा मान मिळवला होता.

त्या ऐतिहासिक क्षणी भारताने घरच्या मैदानावर बलाढ्य इंग्लंडविरुद्धची पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका ३-२ अशा फरकाने जिंकली होती. धोनीच्या संयमी, मुत्सद्दी आणि दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाखाली भारताने जुन्या आणि नव्या पिढीचा सुरेख मेळ घातला होता. सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग यांसारख्या दिग्गजांच्या युगाकडून रोहित शर्मा, विराट कोहली यांच्या नव्या युगाकडे होणारे संक्रमण धोनीने अत्यंत कुशलतेने हाताळले. २०१३ मध्ये रचला गेलेला हा भक्कम पाया पुढे भारतीय क्रिकेटची संस्कृती बनला, जिथे केवळ सामने जिंकणे नव्हे तर प्रत्येक मालिकेत वर्चस्व गाजवणे हे संघाचे ध्येय ठरले.

### सप्टेंबर २०२३ ते आजतागायत: ३५ महिन्यांचे निर्विवाद साम्राज्य

सप्टेंबर २०२३ मध्ये भारताने पाकिस्तानला मागे टाकत पुन्हा अव्वल स्थान पटकावले. त्यानंतरच्या ३५ महिने आणि १८ दिवसांच्या प्रवासात भारतीय संघाने मायदेशात आणि परदेशात अनेक आव्हानात्मक मालिका जिंकल्या.

या प्रदीर्घ वर्चस्वामागे भारतीय संघाची अद्वितीय ताकद उभी आहे. भारतीय संघाचे फलंदाजी क्रम हे जागतिक स्तरावर सर्वात धोकादायक मानले जाते. डावाची सुरुवात करताना मिळणारी आक्रमक सुरुवात, मधल्या फळीतील संयमी आणि डाव सावरणारी फलंदाजी, आणि अखेरच्या षटकांमध्ये वेगाने धावा कुटण्याची क्षमता यांमुळे भारताने अनेकदा ३०० हून अधिक धावांचे टप्पे सहज पार केले आहेत किंवा विरोधी संघांनी उभारलेली आव्हाने लीलया पेलली आहेत.

दुसरीकडे, भारताची गोलंदाजी ही या कालखंडातील सर्वात मोठी जमेची बाजू ठरली आहे. एकेकाळी केवळ फलंदाजांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताकडे आज जगातील सर्वोत्तम वेगवान मारा आणि दर्जेदार फिरकीपटूंची फळी उपलब्ध आहे. नवीन चेंडूने दोन्ही बाजूंनी स्विंग करण्याची क्षमता, मधल्या षटकांमध्ये अचूक टप्प्यावर चेंडू ठेवून फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडणे, आणि डेथ ओव्हर्समध्ये यॉर्कर्सचा मारा करून धावा रोखणे या कौशल्यांमुळे भारतीय गोलंदाजांनी प्रतिस्पर्धी संघांना वारंवार निष्प्रभ केले आहे.

### आयसीसी क्रमवारी ठरवण्याचे गणित: केवळ विजय पुरेसे नसतात

अनेकदा सामान्य क्रिकेट रसिकांना असा प्रश्न पडतो की आयसीसी एकदिवसीय संघांची क्रमवारी नक्की कशी ठरवली जाते? ही पद्धत समजून घेणे अत्यंत रंजक आणि गुंतागुंतीचे आहे. ही क्रमवारी केवळ जिंकलेल्या सामन्यांच्या साध्या संख्येवर मोजली जात नाही; तर त्यामागे कामगिरीतील सातत्य, प्रतिस्पर्धी संघाची ताकद आणि सामन्यांचे मानांकन भारांकन यांचा सूक्ष्म विचार केला जातो.

आयसीसीच्या प्रणालीमध्ये प्रत्येक सामन्याला गुण दिले जातात. हे गुण प्रतिस्पर्धी संघाच्या त्यावेळच्या रेटिंगवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, जर एका उच्च मानांकित संघाने तुलनेने कमकुवत संघाला पराभूत केले, तर विजेत्या संघाला मिळणारे रेटिंग गुण मर्यादित असतात; कारण त्या सामन्यात त्यांचा विजय अपेक्षित धरलेला असतो. याउलट, जर एखाद्या खालच्या क्रमांकावरील संघाने अव्वल क्रमांकाच्या संघाला पराभूत केले, तर त्या खालच्या संघाला प्रचंड प्रमाणावर गुणांचा फायदा होतो, तर पराभूत अव्वल संघाचे रेटिंग वेगाने घसरते.

तसेच, मालिकेतील सामन्यांच्या निकालांचे मूल्यमापन ठराविक कालावधीसाठी केले जाते. गेल्या १२ महिन्यांतील सामन्यांना १०० टक्के भारांकन दिले जाते, तर त्यापूर्वीच्या २४ महिन्यांतील सामन्यांना ५० टक्के भारांकन दिले जाते. या सर्व सामन्यांतून मिळालेले एकूण गुण आणि खेळलेले एकूण सामने यांचे गणितीय गुणोत्तर काढून अंतिम रेटिंग ठरवले जाते.

याच पद्धतीमुळे भारताचे ११६ हे रेटिंग अत्यंत मोलाचे ठरते. याचा अर्थ असा होतो की भारताने या कालावधीत केवळ सामने जिंकले नाहीत, तर उच्च मानांकित संघांविरुद्ध मोठे विजय मिळवले आहेत आणि अत्यंत क्वचितच अनपेक्षित पराभव पत्करले आहेत. कामगिरीतील याच सातत्यामुळे भारताला गेल्या ३५ महिन्यांहून अधिक काळ आपले सिंहासन अबाधित राखता आले आहे.

### सातत्यामागील अंतर्गत रचना आणि खेळाडूंची खोली (बेंच स्ट्रेंथ)

भारतीय क्रिकेटच्या या प्रदीर्घ यशाचे खरे रहस्य त्यांच्या बेंच स्ट्रेंथमध्ये अर्थात राखीव खेळाडूंच्या गुणवत्तेत दडलेले आहे. देशांतर्गत क्रिकेटची मजबूत रचना, रणजी करंडक, विजय हजारे करंडक यांसारख्या स्पर्धा आणि इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) यांसारख्या उच्च दर्जाच्या लीगमुळे भारतीय क्रिकेटला आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी तयार असलेले खेळाडू सातत्याने मिळत राहिले आहेत.

एखादा प्रमुख खेळाडू दुखापतग्रस्त झाला किंवा त्याला विश्रांती दिली गेली, तरी संघात येणारा नवा खेळाडू तितक्याच ताकदीने कामगिरी करतो. एकाच वेळी दोन आंतरराष्ट्रीय संघ मैदानात उतरवण्याची क्षमता आज भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडे आणि भारतीय निवड समितीकडे आहे. ही लवचिकता इतर कोणत्याही देशाकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नाही. खेळाडूंमधील निकोप स्पर्धा प्रत्येकाला आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यास प्रवृत्त करते, ज्याचा थेट फायदा संघाच्या रेटिंगला आणि क्रमवारीत होतो.

### आधुनिक रणनीती आणि मानसिक कणखरता

गेल्या काही वर्षांत एकदिवसीय क्रिकेट खेळण्याची शैली पूर्णपणे बदलून गेली आहे. आता ५० षटकांच्या सामन्यात केवळ टिकून खेळणे चालत नाही, तर सुरुवातीच्या पहिल्या षटकापासूनच विरोधी संघावर दबाव टाकण्याची रणनीती अवलंबावी लागते. भारतीय संघाने ही आधुनिक शैली अत्यंत वेगाने आत्मसात केली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# सहाही विधानसभा क्षेत्रांत रंगला 'महापौर श्रावण उत्सव'

## महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने सोहळ्याची सांगता, श्रावण क्वीन, फुलराणी, रंग माझा हिरवासह विविध स्पर्धांनी वाढविली उत्सवाची रंगत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे महिलांना त्यांच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही क्षण स्वतःसाठी आनंदाने जगता यावेत, मैत्रिणींसोबत हसता-खेळता यावे तसेच महिला सक्षमीकरणाचा संदेश अधिक बळकट व्हावा, या उद्देशाने महापौर श्रावण उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम नागपूर शहरातील सहाही विधानसभा क्षेत्रांमध्ये संपूर्ण श्रावण महिन्यात उत्साहात पार पडला. या उपक्रमाची सांगता आज (ता.८) जरीपटका येथील दयानंद पार्क येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाली.




श्रावण महिन्याची पारंपरिक संस्कृती, वेशभूषा, गीत-संगीत आणि विविध मनोरंजक स्पर्धांनी या उत्सवाला विशेष रंगत आणली. सहाही विधानसभा क्षेत्रांत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये महिलांनी विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. काही महिलांनी शंकर-पार्वती, राधा-कृष्ण तसेच देवीच्या विविध रूपांची वेशभूषा साकारत कार्यक्रमाची शोभा वाढविली.

श्रावणातील हिरवळीची संकल्पना लक्षात घेऊन महिलांनी झाडांची पाने, फुले आणि विविध नैसर्गिक घटकांचा कल्पकतेने वापर करून आपली वेशभूषा आणि सजावट केली. लहान मुलींपासून ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील महिलांनी नृत्य स्पर्धा, फॅशन शो तसेच विविध खेळांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. सहाही विधानसभा क्षेत्रांतील उद्यानांमध्ये फुलांनी सजविलेले झोपाळे उभारण्यात आले होते. महिलांनी झोपाळ्यावर झोका घेत श्रावण गीते म्हणत सेल्फी घेत उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी सांगितले की, महिला या कुटुंबाच्या आणि समाजाच्या आधारस्तंभ आहेत. घर, मुलं, नोकरी-व्यवसाय अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळताना अनेकदा त्या स्वतःच्या आनंदासाठी वेळ देऊ शकत नाहीत. म्हणूनच त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची एक सुंदर झलक फुलावी, त्यांच्या कलागुणांना मुक्तपणे वाव मिळावा आणि मैत्रिणींसोबत मनमोकळेपणाने आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या उद्देशाने महापौर श्रावण उत्सव हा उपक्रम राबविण्यात आला आहे. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग आणि त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून या उपक्रमामागील संकल्पना खऱ्या अर्थाने सार्थ ठरल्याचा आनंद आहे, असे महिलांच्या मिळालेल्या या सहकार्याचे त्यांनी स्वागत केले. तसेच आयोजक क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड व संजोयक टीमचे कौतुक करत थाप दिली.

याप्रसंगी कार्यक्रमाला उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, मंगळवारी झोन सभापती सीमा डवरे, नगरसेविका सुषमा चौधरी, प्रमिला मथरानी, निरंजना पाटील, रेखा पाटील, माजी महापौर संदीप जाधव, माजी नगरसेविका प्रगती पाटील, माजी नगरसेविका नेहा निकोसे, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. या संपूर्ण उपक्रमाला उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे आणि सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

क्रीडा समिती सभापती दर्शनी धवड बोलतांना म्हणाल्या, श्रावण हा केवळ धार्मिक विधी आणि उपवासाचा महिना नसून, भारतीय संस्कृतीतील उत्सवप्रियता, परंपरा आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करणारा काळ असल्याचे सांगितले. कुटुंब, मुलं तसेच नोकरी-व्यवसायाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना स्वतःसाठी वेळ मिळावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**विविध स्पर्धांनी रंगली श्रावणाची रंगत**

महापौर श्रावण उत्सवामध्ये श्रावण क्वीन, फुल राणी, तुझी माझी जोडी आणि रंग माझा हिरवा यांसारख्या विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यासोबतच श्रावण गीते, नृत्य, विविध खेळ, फॅशन शो आणि मनोरंजनात्मक उपक्रमांनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. कार्यक्रमात सहभागी प्रत्येक महिलेचा आनंद द्विगुणित व्हावा, यासाठी सहभागी महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. विविध स्पर्धांमधील विजेत्या महिलांचा पैठणी साडी आणि डिनर सेट देऊन गौरव करण्यात आला. सहाही विधानसभा क्षेत्रांत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमांचे निवेदन प्रमय लोखंडे यांनी केले. महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आनंदी सहभाग यामुळे महापौर श्रावण उत्सव हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

# एकल महिला सर्वेक्षणात मोठ्या संख्येत सहभागी व्हा!

### नागपूर महानगरपालिकेद्वारे एकल महिलांसाठी ऑनलाईन सर्वेक्षण व नोंदणी सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

एकल महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना व कल्याणकारी उपक्रमांचा लाभ मिळवून देण्यासह एकल महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण व नोंदणी सुरू आहे. ही नोंदणी महत्त्वपूर्ण असून, नागपूर शहरातील सर्व एकल महिलांनी सदर ऑनलाईन सर्वेक्षणात सहभाग नोंदवून आपली संपूर्ण माहिती अचूकपणे भरून नोंदणी करावी, असे आवाहन महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांनी केले आहे.

महापौर निता ठाकरे व मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या मार्गदर्शनात समाज विकास विभागामार्फत महाराष्ट्र राज्य शासनाच्या महिला व बाळ विकास विभागाच्या निदेर्शानुसार, नागपूर शहरात एकल महिलांचे सर्वेक्षण व नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मनपा क्षेत्रातील पतीचे निधन झालेल्या एकल महिलांची माहिती संकलित करून त्यांना विविध सामाजिक, आर्थिक, तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने ही नोंदणी करण्यात येत आहे. यासाठी मनपाने ऑनलाईन पोर्टलद्वारे नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली असून, शहरातील सर्व पात्र एकल महिलांनी http://admin-dept-portal.emergent.host या संकेतस्थळावर जाऊन आपली माहिती भरून नोंदणी करावी असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे.

# मारबत महोत्सवासाठी मनपा सज्ज

### 'मारबत महोत्सवा'च्या अनुषगाने महापौरांनी घेतला आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या सांस्कृतिक परंपरेची ओळख असणाऱ्या मारबत महोत्सवाला आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी नागपूर महानगरपालिका प्रयत्नरत असून, येत्या ११ सप्टेंबर रोजी आयोजित मारबत महोत्सवासाठी मनपा सज्ज आहे. महोत्सवाअंतर्गत विविध उपक्रम राबविल्या जात आहेत. बडग्या-मारबत महोत्सवात सर्वांना उत्तम सोयीसुविधा पुरविण्यासाठी मनपा कटिबद्ध असल्याचे महापौर निता ठाकरे यांनी सांगितले.



नागपूरची पारंपारिक व ऐतिहासिक ओळख असणाऱ्या 'मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने आवश्यक नियोजन करण्यासाठी महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेत मंगळवार (ता.८) बैठक पार पडली. बैठकीला स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, मुख्य अभियंता लीना उपाध्ये, उपायुक्त निर्भय जैन, मंगेश खवले, राजेश भगत, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, अधीक्षक अभियंता विजय गुरुबक्षाणी, कार्यकारी अभियंता रवींद्र बुंधाडे, राजीव गौतम, गिरीश लिखार, सचिन रक्षमवार, अनिल गेडाम, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, विवेक रानडे, गजानन रानडे यांच्यासह इतर उपस्थित होते.

नागपूर शहरात पर्यटकांचा ओघ वाढविण्यासह शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्यासाठी तसेच नागपूरचा सांस्कृतिक वारसा समृद्धकरण्यासाठी मनपाद्वारे मारबत महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. बैठकीत महापौर निता ठाकरे यांनी मारबत मार्गावर भ्रमण करणाऱ्या नागरिकांना कसलाही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. सोबतच महोत्सवात येणाऱ्या नागरिकांना उत्तम सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात असेही निर्देश त्यांनी दिले. मारबत व बडग्या यांच्या मार्गावर पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतेची व्यवस्था करण्याच्या सूचना सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांनी दिल्या.

तसेच महोत्सवासाठी परदेशातून येणाऱ्या वाणिज्य राजदूत/परदेशी प्रतिनिधी, मा. मंत्री महोदय, लोकप्रतिनिधी, सिनेअभिनेता आदी मान्यवरांच्या शिष्टाचाराचे उत्तम पालन करण्यात यावे, अशी सूचना स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी केली. बैठकीच्या प्रारंभी क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांनी मारबत महोत्सवाच्या नियोजनासह महोत्सवा अंतर्गत आयोजित भजन संध्या, छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनी आदी विविध उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.



# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम १३ सप्टेंबरला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी महाल येथील गडकरी वाडा येथे आयोजित करण्यात आला आहे. महालातील गडकरी वाडा येथे मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत ना. श्री. नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

# सावनेर नगरपरिषदेकडून "अभय योजनेला" ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

### थकीत मालमत्ता करावरील शास्तीमध्ये ५० टक्के सूट, नागरिकांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर नगर परिषद क्षेत्रातील मालमत्ता कर थकबाकीदार नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने अभय योजना (शास्ती सूट योजना) सुरू केली असून, या योजनेला आता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कराची रक्कम भरताना शास्तीवर ५० टक्के सूट देण्यात येणार आहे.




सावनेर शहरातील नागरिकांनी नियमितपणे मालमत्ता कर भरावा तसेच कर थकबाकी कमी व्हावी, या उद्देशाने नगर परिषदेमार्फत ही विशेष योजना राबविण्यात येत आहे. यामुळे थकीत मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना आर्थिक सवलतीचा लाभ मिळणार असून, नगर परिषदेला शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

शास्तीमध्ये ५० टक्के सूट अभय योजनेचा सर्वात महत्त्वाचा लाभ म्हणजे थकीत मालमत्ता कराच्या रकमेवरील शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. त्यामुळे थकबाकीदार नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन आपला मालमत्ता कर भरण्याचे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

**३१ डिसेंबर २०२६ अंतिम मुदत**

अभय योजना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत लागू राहणार आहे. नागरिकांनी अंतिम मुदतीपूर्वी थकीत मालमत्ता कराचा भरणा करून शास्तीवरील ५० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी आपल्या मालमत्ता कराची थकबाकी व शास्तीची माहिती नगर परिषद कार्यालयातील संबंधित विभागाकडून तपासून घ्यावी. तसेच अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी सावनेर नगर परिषद मालमत्ता कर विभागाशी संपर्क साधून आवश्यक अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**कर भरा, शहराच्या विकासाला हातभार लावा**

नागरिकांनी नियमितपणे मालमत्ता कर भरल्यास नगर परिषदेला शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, प्रकाश व्यवस्था तसेच विविध नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. त्यामुळे आपले शहर... आपली जबाबदारी या भावनेतून नागरिकांनी कर भरण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**विशेष आवाहन :**

अभय योजना - शास्तीवर ५० टक्के सूट आसुन त्याची अंतिम मुदत : ३१ डिसेंबर २०२६ ही विशेष संधी चुकवू नका. आजच थकीत मालमत्ता कर भरून ५० टक्के शास्ती सवलतीचा लाभ घ्या, असे आवाहन नगर परिषद सावनेर च्या मुख्याधिकारी अर्शीया जुही तसेच संजना मंदार मंगळे नगराध्यक्षा, नगर परिषद सावनेर, भिमराव उर्फ राजू घुगल उपाध्यक्ष, नगर परिषद सावनेर यांनी केले असुन पत्रपरिषदेला नगर परिषद सावनेरचे नियोजन सभापती नीलेश पटे, कर आधिकारी देवेंद्र निकोसे प्रामुख्याने उपस्थित होते.

थोडक्यात

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बल्लारपुरात पोलिसांचा रूट मार्च



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

आगामी पोळा, तान्हा पोळा आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बल्लारपूर शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलिसांनी शहरातून रूट मार्च काढत सुरक्षेची सज्जता दाखवून दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार सुशांत यांच्या नेतृत्वात हा रूट मार्च पार पडला. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी पोलीस ठाणे बल्लारपूर येथून रूट मार्चला सुरुवात झाली. गोल पुलिया, सिद्धार्थ वॉर्ड, गांधी वॉर्ड, श्रीराम वॉर्ड, गांधी चौक, किल्ला वॉर्ड मार्गे गणपती विसर्जन घाटापर्यंत पोलिसांनी संचलन केले. त्यानंतर याच मार्गाने परत येत पोलीस ठाण्यात रूट मार्चची सांगता झाली. सण-उत्सव काळात शहरात मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असल्याने संभाव्य अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. रूट मार्चच्या माध्यमातून नागरिकांना शांतता व सुव्यवस्था राखण्याचा संदेश देतानाच पोलिसांची सुरक्षा यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या रूट मार्चमध्ये सात पोलीस अधिकारी, ३३ अंमलदार, आरसीपीचे २१ जवान आणि क्यूआरटीचे पाच जवान सहभागी झाले होते.पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, मदन दिवटे, शब्बीर पठाण तसेच पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड, वैभव चव्हाण, डिसेंबर दिवटे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. आगामी सण-उत्सव शांततेत पार पडावेत, यासाठी बल्लारपूर पोलिसांकडून शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनीही कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नर्मदा नगर एकता सोसायटीचा रस्ता चोरी गेल्याचा आरोप : शैलेश पांडे

### नागपूर सुधार प्रन्यासच्या धोरणाविरोधात बेमुदत उपोषणाला सुरुवात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

गोधनी ते गोरेवाडा परिसरातील नागरिकांचे प्रश्न आणि त्या भागातील मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी नगरसेवक शैलेश पांडे यांनी नागपूर सुधार प्रन्यास प्रशासनाविरोधात बेमुदत उपोषणच्या लढाईला सुरुवात केली आहे. ७ सप्टेंबर म्हणजे सोमवारपासून नगरसेवक शैलेश पांडे हे बेमुदत उपोषणाला बसलेले आहे. गोधनी ते गोरेवाडा मागार्चे रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी व मंजूर ले आउट मधील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविण्याची मागणीसाठी उपोषणाला बसलेले आहे. तसेच गोधनी ते गोरेवाडा टॉवर रोडचे मुख्य मार्गाचे जवळपास काम पूर्ण झाले असून हेरिटेज स्कूल जवळून उद्यान नगराकडे जाणारा केवळ सातशे ते आठसे मीटरचा तुकडा अद्याप अपूर्ण आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यास नागरिकांना थेट आणि सुरक्षित प्रवास करता येईल तसेच वेळ व इंधनाची मोठी बचत होईल.

या भागातील वेगाने वाढणारी लोकसंख्या पाहता रस्त्याचा प्रश्न तात्काळ न सुटल्यास येत्या काळात पायी चालणे ही कठीण होईल. असा इशारा यावेळी नागरिकांनी दिलेला आहे तरी सुधार प्रन्यास ने यावर ताबडतोब पाऊल उचलावे व नागरिकांना न्याय द्यावा. नर्मदा नगर एकता सोसायटीमध्ये तीस फुटाचा रस्ता चोरीला गेला असं सुद्धा त्यांनी नागपूर सुधार प्रन्यासवर आरोप लावलेला आहे. या सर्वांची उत्तरे एनटीच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन ठिकाणी येऊन द्यावी. अशी सुद्धा त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दात सांगितले आहे. उपोषणनाला बसलेले नागरिक व नगरसेवकांच्या सर्व प्रकारच्या मागण्या मान्य करावेच लागेल अन्यथा बेमुदत उपोषण सुरूच राहील, असा इशारा दिला आहे.

## बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रुपतर्फे वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन रविवारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था संचालित बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रुपच्या वतीने आयोजित केलेला मेळावा नागपूर शहरात पहिल्यांदाच १३ सप्टेंबर २०२६ रोजी, विदर्भ हिंदी मोर भवन, झाशी राणी चौक, पहिला माळा, अर्पण हॉलमध्ये सिताबर्डी नागपूर येथे वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन दुपारी १२ ते ४ यावेळेत करण्यात आलेला आहे. तरी कृपया सर्व समाज बांधवांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे. असे आयोजकांनी आवाहन केले आहे. या वधू -वर परिचय मेळाव्याच्या कार्यक्रमाला प्रमोद सोमकुंवर, नरेश गायकवाड, उमाकांत सोमकुंवर, पोर्णिमा सोमकुंवर, सुषमा सोमकुंवर आणि दिनेश घरडे अथक परिश्रम घेत आहे.

## टिटवाळा ब्लॉकमुळे अमरावती एक्स्प्रेसच्या वेळेत बदल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

टिटवाळा स्थानकातील फलाट विस्ताराच्या कामासाठी सुरू असलेल्या विशेष ब्लॉकमुळे १० आणि ११ सप्टेंबरला लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे. अमरावती-सीएसएमटी एक्स्प्रेसच्या वेळेत बदल होणार असून, विदर्भ आणि दुरान्तो एक्स्प्रेस विलंबाने धावणार आहेत.ध्य रेल्वेकडून टिटवाळा स्थानकातील फलाटाचा विस्तार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. १५ डब्यांच्या लोकल गाड्या चालविण्यासाठी फलाटाची लांबी वाढविण्यात येत आहे. या कामासाठी २८/२९ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ११/१२ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत दररोज रात्री पाच ते सहा तास विशेष वाहतूक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येत आहे.

थोडक्यात

## पारशिवनी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत राष्ट्रीय आदर्श विद्यालयाचा दबदबा



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत ७ व ८ सप्टेंबरला राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवेगाव खैरी येथे कबड्डी स्पर्धा पार पडल्या. राष्ट्रीय आदर्शच्या खेळाडूंनी शिस्त, चिकाटी, धैर्य, चपळता आणि एकजुटीचा अवलंब करीत १७ वर्षीय मुलींचा संघ, १४ वर्षीय मुलींचा संघ, १४ वर्षे मुलांचा संघ आणि १९ वर्षीय मुलांच्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळवून तालुक्यातून विजेतेपद पटकावले.

यावेळी आयुषी पंधराम, हर्षु पिल्लारे, अश्रुता भोयर, आभा भरदिया, मानवी सलामे, प्रीती इनवाते, अंजली आंबाडारे, जिया राऊत, खुशी राऊत, गौरी मेश्राम, त्रिवेणी सावरकर, त्रिशा सावरकर, मैना मैंद, पूर्वी कोहळे, आर्या कोहळे, लावण्या सिंदराम सुजाता पनवारे, अनिकेत सहारे, सोहम कंगाली, प्रज्वल खंडाते, तनवीर पिल्लारे, शौर्य सोनटक्के, अंशुल कुसराम, अन्वेष दुनेदार, सारंग भलावी, साहिल नराटे, दीपांशू पंधराम, रोहित मुंगभाते, विपीन मारबते, आनंद नैताम, प्रीतम ढोरे आयुष पंधराम, एकांस सहारे या खेळाडूंनी विजयाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक राजू बर्वे, मार्गदर्शक शिक्षक साक्षोधन कडबे, प्रशिक्षक मनीष राऊत, क्रीडा शिक्षक शैलेंद्र देशमुख, तालुका क्रीडा संयोजक रितेश मैंद, सतीश जुननकर, प्रा.अरविंद दुनेदार, दिलीप पवार, अमित मेश्राम आणि शाळेच्या समस्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले. अतिशय दुर्गम व आदिवासी भागातील खेळाडूंनी कठोर परिश्रमातून प्राप्त केलेल्या यशाबद्दल परिसरातील पालक वर्गातून व सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## प्रभाग २८ येथे पदवीधर मतदार नोंदणीबाबत आढावा बैठक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आगामी नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात घेऊन घातलेल्या नागपूर विभागीय पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकी संदर्भात विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांनी प्रभाग २८ रमणा मारुती दिघोरी येथे नुकताच आढावा बैठक घेतली. यामध्ये येणाऱ्या ३० सप्टेंबर पर्यंत जास्तीत जास्त पदवीधर मतदारांची नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिकांना केले. यावेळी प्रामुख्याने ब्लॉक ४ काँग्रेस अध्यक्ष राहुल अभंग, जेष्ठ कार्यकर्ते ईश्वर ढोले, राजू मोहोड, पुरुषोत्तम मुरमे, एकनाथ काळमेघ, सुरेश जिचकार, सौरभ काळमेघ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनजागृती सेवा संस्थेच्या आरती संग्रहाचे प्रकाशन,

## अभिनेते अभय खडपकर यांचे कौतुक, आरती संग्रह कोकणातील प्रत्येक घरात पोहोचावा!



**दै. सिंहवाणी वृत्त, कणकवली- गुरुनाथ तिरपणकर**

जनजागृती सेवा संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन शुक्रवारी कणकवली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी बोलताना अभिनेते अभय खडपकर यांनी आरती संग्रहाचे कौतुक करत, 'अत्यंत दर्जेदार आणि वाचण्यासाठी सुलभ असा हा आरती संग्रह कोकणातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा,' अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन अभय खडपकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने, तर माजी जिल्हा परिषद सदस्या राजश्री धुमाळे यांच्या हस्ते गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नगरसेविका मनस्वी ठाणेकर, अक्षरोत्सव प्रमुख तथा पत्रकार निकेत पावसकर, सेवानिवृत्त वाहतूक निरीक्षक प्रकाश साखरे, उद्योजक मिथुन ठाणेकर आणि जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. संग्रहाचे अवलोकन केल्यानंतर उपस्थितांनी त्याचे विशेष कौतुक केले. जनजागृती सेवा संस्थेच्या सातत्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचेही यावेळी गौरवोद्गार काढण्यात आले. कोकणासह महाराष्ट्रातील विविध भागांत संस्थेने उभारलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमात गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, संस्था अहवाल, आभारपत्र, आरती संग्रह आणि गणेश प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार गुरुनाथ तिरपणकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर आणि गंधाली तिरपणकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

## दुष्काळ जाहीर करा अन्यथा जिल्हानिहाय बिऱ्हाड आंदोलन छेडणार

**परभणी** : महाराष्ट्रातील अनेक भागांत गेल्या ४५ दिवसांपासून पावसाचा खंड पडल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून नुकसानभरपाई द्यावी, जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडीचे उत्तर जिल्हाध्यक्ष प्रमोद कुटे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# भक्तीच्या सुरात अन् संस्कृतीच्या सुगंधात न्हाऊन निघाले नेहरु पुतळा चौक परिसर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संस्कृतीचा अनमोल वारसा आणि परंपरेचे सोनेरी धागे विणत नागपूर नगरीत सध्या मारबत महोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह आणि चैतन्य पाहायला मिळत आहे. या ऐतिहासिक व पारंपरिक महोत्सवाच्या अंतर्गत मंगळवारी (ता. ८) संध्याकाळी नेहरू पुतळा, मस्कासाथ परिसर भक्तिभावाच्या आणि संगीताच्या अथांग सुरात पूर्णपणे न्हाऊन निघाला. नागपूर महानगरपालिका आणि श्री काली मारबत उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने आयोजित भव्य 'भजनसंध्या' कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक किशन भगत यांच्या सुरेल व ओघवत्या आवाजाने उपस्थितांच्या मनाचा ताबा घेतला.





याप्रसंगी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड आणि स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे,सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अ.प.) गटनेते तथा काली मारबत उत्सव समितीच्या संयोजिका आभा पांडे, सतरंजीपुरा झोन सभापती अभिरुची राजगिरे, नगरसेवक संतोष (रामभाऊ) आंबुलकर, नगरसेवक तुषार लारोकर, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर तसेच काळी मारबत उत्सव समितीचे अध्यक्ष गौरव हारडे यांच्यासह समितीचे तमाम पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना महापौर निता ठाकरे यांनी मारबत महोत्सवाच्या या विस्तारित स्वरूपावर अत्यंत सुंदर शब्दांत भाष्य केले. त्या म्हणाल्या, "नागपूरच्या जुन्या परंपरा आणि सांस्कृतिक वारसा केवळ आपल्यापुरता मर्यादित न राहता जागतिक पातळीवर पोहोचायला हवा, हाच या महोत्सवामागचा मूळ उद्देश आहे. पूर्वी केवळ एका दिवसापुरता मर्यादित राहणारा हा मारबत उत्सव यंदा मनपातर्फे सलग चार-पाच दिवस विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून एका भव्य महोत्सवाच्या रूपात साजरा होत आहे." या आयोजनात मोलाचा हातभार लावणाऱ्या प्रत्येक घटकाचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केले.

**भक्तीच्या सुरांनी दुमदुमला परिसर: किशन भगत यांचे मंत्रमुग्ध करणारे गायन**

संध्येच्या या दिव्य कार्यक्रमाची सुरुवात गायक किशन भगत यांनी विघ्नहर्ता श्री गणेशाच्या अथांग आराधनेने केली. बाबा गणपती की आई फौज आणि मोहे अंगना गजानन आयो रे या सुरेल व उत्साही भक्तिगीतांनी अवघा परिसर दुमदुमून गेला.

यानंतर एकापाठोपाठ एक सादरीकरण झालेल्या बस इतनी कृपा करना, मेरा वक्त सुधार जाए, मैं भोले का दीवाना आणि मुझको बस महाकाल बाबा चाहिए यांसारख्या भावपूर्ण रचनांनी श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. या अफाट संगीतमय आणि भक्तीमय सादरीकरणाने उपस्थित प्रत्येक जण भक्तीच्या सागरात तल्लीन होऊन गेला आणि उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद देत या संध्येचा मनसोक्त आनंद घेतला.

या ऐतिहासिक व भक्तीमय सोहळ्यात नागपूरच्या समृद्ध संस्कृतीचे अहोरात्र जतन करणाऱ्या काळी मारबत उत्सव समितीचे अध्यक्ष गौरव हारडे तसेच समितीच्या सर्व सदस्यांचा महानगरपालिकेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. महापौर निता ठाकरे व स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनपाचे क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर यांनी केले.

# 'वनार्टी'च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर शासनाची निर्णायक भूमिका

### मुख्यमंत्री फडणवीसांचे १५ दिवसांत ठोस निर्णयाचे आश्वासन, उपोषण स्थगित



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विमुक्त जाती (व्हीजे-ए) तसेच भटक्या जमाती-ब, क आणि ड (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) प्रवर्गातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या अधिछात्रवृत्तीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाची अखेर सकारात्मक वातावरणात सांगता झाली. आंदोलनाचा आज सातवा दिवस असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांची दखल घेत १५ दिवसांत योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शासनाच्या या सकारात्मक भूमिकेनंतर वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी)चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. यावेळी बालासाहेब घुगे, निलेश घुगे, कृष्णा नागरगोजे, रवि राठोड, प्रणव औंधकर, सुनयना सूर्यवंशी, आदिती पालवे, गायत्री पुरी, सचिन खरात, विशाखा मेश्राम, माऊली गोयेकर, अशोक गायकवाड, ओंकेश इघारे, शुभम पालवे, संदीप शिंदे, राजपाल कुतुंबरे, प्रतिक्षा गरजे यांच्यासह मोठ्या संख्येने संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

व्हीजे-एनटी प्रवर्गातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना स्वतंत्र अधिछात्रवृत्ती योजना सुरू करून त्यांच्या संशोधनाला आर्थिक आधार मिळावा, या न्याय्य मागणीसाठी विद्यार्थ्यांनी वनार्टी कार्यालयासमोर सात दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची शासनाने गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली. वनार्टीचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाकडून मागितलेल्या १५ दिवसांच्या कालावधीचा आदर करण्याचे आवाहन केले.

शासनाच्या आश्वासनावर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी उपोषण स्थगित केले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले की, आंदोलनाला कोणताही राजकीय हेतू नसून संशोधक विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या संशोधनासाठी आर्थिक आधार उपलब्ध व्हावा, हा आंदोलनाचा मुख्य उद्देश आहे. शासनाने आंदोलनाची दखल घेत सकारात्मक पाऊल उचलल्याबद्दल विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री संजय राठोड, मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, पंकजा मुंडे आणि आमदार धनंजय मुंडे यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी आंदोलनाला तात्पुरती स्थगिती दिली असली तरी हा कायमस्वरूपी माघार घेतलेला निर्णय नसल्याचे स्पष्ट केले आहे.

पुढील १५ दिवसांत मागण्यांवर ठोस, सकारात्मक आणि लेखी निर्णय होईल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. निर्धारित कालावधीत निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

## आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ देखील तातडीने स्थापले जावे!

**महाराष्ट्रातील कला शिक्षणाची वाताहत थांबवण्यासाठी स्वतंत्र कला विद्यापीठ स्थापनेचा बहुप्रतिक्षित शासन निर्णय निर्गमित करण्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना करून दिले स्मरण**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दृश्य कला विद्यापीठाची स्थापना करून कला महाविद्यालयांना संलग्नता देणे ह्या मागणीची दखल घेत तशी जी घोषणा केली होती त्याला दोन वर्ष पूर्ण होत आहेत याचे स्मरण त्यांना जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीच्या वतीने अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी पत्र पाठवून करून दिले असून या स्वतंत्र कला विद्यापीठ स्थापनेचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.



महाराष्ट्रातील कला शिक्षणाची वाताहत थांबवण्यासाठी स्वतंत्र कला विद्यापीठ स्थापण्याला अन्य पर्याय नसल्याने हे अविलंब करावे अशी विनंती डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केली आहे. माशी कुठे शिंकली व कोणाचे हितसंबंध जपण्यासाठी,हे स्वतंत्र कला विद्यापीठ स्थापण्याचे कोणत्या पातळीवर रोखून धरले गेले आहे ते महाराष्ट्राला कळायला हवे आहे, असेही डॉ. जोशी यांनी पत्रात म्हटले आहे.

या सोबतच 'आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ' कायद्याचे जे प्रारूप सहा वर्षांपूर्वी करून सरकारला दिले गेले होते. ते विद्यापीठ स्थापले न जाणे याचा अर्थ मराठीला आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकास इ.ची भाषा होऊ देण्याचे नाकारणे आणि इंग्रजी हीच तेवढी ज्ञानभाषा,विकासाची भाषा असल्याचा भ्रम सरकारने कायम राखणे असा होतो असे म्हणत, इंग्रजी बाबतचा हा भ्रम दूर सारून मराठी राज्यकर्त्यांनी राज्य निर्माण होऊन ७० वर्ष होऊन गेल्यावर तरी मराठीला आता ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकास इ.च्या संधींची भाषा करणे यासाठी हे अपारंपारिक 'आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ ' तसा कायदा करून मराठी भाषा विभाग आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी संयुक्तपणे स्थापण्याचा शासन निर्णय निर्गमित करावा याकडे पुनः एकदा पत्रात लक्ष वेधण्यात आले आहे. पत्राच्या प्रती यथायोग्य कार्यवाहीसाठी, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कला संचालक यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

# 'चला शाळेत जावूया'अभियानांतर्गत राज्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे जिल्हा चनकापूर शाळेत!

### सुंदर शाळा म्हणून कौतूक

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांची जिल्हा परिषद आदर्श उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा चनकापूर,ता. सावनेर, जि. नागपूर येथे भेट दिली.

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांची जिल्हा परिषद आदर्श उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा चनकापूर,ता. सावनेर,जि. नागपूर येथे भेट देऊन शाळेतील विविध शैक्षणिक व भौतिक सुविधांची तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची सविस्तर माहिती जाणून घेतली. या भेटीदरम्यान शिक्षणमंत्र्यांनी शाळेतील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

**शालेय पोषण आहार व्यवस्था**

विद्यार्थ्यांना दिला जाणारा पोषण आहार, त्याची गुणवत्ता, स्वच्छता, पाककृती व आहार व्यवस्थापन याबाबत त्यांनी माहिती घेतली, यासोबतच मा शिक्षणमंत्र्यांनी स्वतः विद्यार्थ्यांसमवेत पोषण आहाराचा आस्वाद सुद्धा घेतला व एकंदरीत गुणवत्तेबद्दल समाधान व्यक्त केले.



या भेटीदरम्यान शिक्षण मंत्री यांनी शाळेतील विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी करून शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षकांची प्रत्यक्ष बैठक घेवून शाळेसंदर्भात सविस्तर माहिती घेतली. दफ्तरमुक्त शाळा, ऑलिम्पियाड परीक्षा, शिष्यवृत्ती, शिवसृष्टी, भारतातील पहिली AI-VR lab, Ideal, Astrophysics लैब , सामूहिक कवायत इत्यादींची माहिती शिक्षकाकडून घेण्यात आली. श्फ लैब चा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि त्याचे भरभरून कौतुक केले. शाळेला लागणाऱ्या काही सुविधा बद्दल पण जाणून घेतले ज्यात शिक्षकांद्वारा काही वर्गखोल्या, सभागृह, सर्व विद्यार्थ्यांसाठी शूज आणि सॉक्स, कायमस्वरुपी लिपिक, परिचारक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची मागणी करण्यात आली. या सर्व मागण्या तातडीने पूर्तता करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. खिचडी स्वयंपाकी आणि मदतनीस यांचेशी सुद्धा संवाद साधून त्यांचे मानधन वाढण्यासंदर्भाने सुद्धा सकारात्मक प्रतिसाद दिला.

शिक्षणमंत्री यांनी शाळेतील विविध वर्गांना भेट देऊन वर्ग अध्यापनाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. शिक्षकांकडून राबविल्या जाणाऱ्या अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांचा सहभाग, प्रश्नोत्तरांची पद्धत, अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न तसेच विद्यार्थ्यांची विषय समजून घेण्याची क्षमता याबाबत त्यांनी बारकाईने माहिती घेतली.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी अतिशय आपुलकीने व मोकळेपणाने संवाद साधला. विद्यार्थ्यांनी सुद्धा शिक्षणमंत्री साहेबांना विविध विषयांवर प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांच्या निरागस प्रश्नाना मनमुराद उत्तरे शिक्षण मंत्र्यांनी दिले. शिक्षणमंत्र्यांच्या भेटीमुळे शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळाली असून, गुणवत्तापूर्ण, आनंददायी आणि अनुभवाधारित शिक्षणाच्या दिशेने आणखी प्रभावीपणे कार्य करण्याची नवी ऊर्जा मिळाली आहे.

याप्रसंगी शिवलिंग पटवे विभागिय शिक्षण संचालक, दिपेंद्र लोखंडे विभागीय सहसंचालक, हर्षलता बुराडे प्राचार्य डायट नागपूर, अनिल दहिफळे शिक्षणाधिकारी माध्यमिक, निलेश गुंड शिक्षणाधिकारी प्राथमिक, मनोज हिरूडकर गटविकास अधिकारी सावनेर,अभिजित कावरे गटशिक्षणाधिकारी सावनेर, विशाल गौर, उपशिक्षणाधिकारी कश्यप सावरकर विस्तार अधिकारी, पुरुषोत्तम मुंडे विस्तार अधिकारी, निलेश सपाटे, केंद्रप्रमुख अनिल भेदे मुख्याध्यापक जयश्री शिंदे, अधिक्षक पीएम पोषण, प्रकाश खापरे माजी जिल्हा परिषद सदस्य, राहुल तिवारी माजी उपसभापती पंचायत समिती सावनेर, विश्वजित सिंह, माजी उपसरपंच चनकापूर,विनोद सातंगे नेता शिवसेना, सूरज गोजे, नगरसेवक मनपा नागपूर इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जीवन पुन्हा नाही; उमेद, उत्साह आणि आनंदाने जगण्याची कला शिका

जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन विशेष



डॉ. प्रितम भि. गेडाम
नागपूर

जीवनाचे मोल केवळ एका गोष्टीवरून समजून घ्या की, एखादे मृत शरीर आहे; जगातील सर्व संपत्ती खर्च करून, अत्याधुनिक रुग्णालये, सरकारे, धार्मिक कर्मकांड या सर्वांनी मिळून प्रयत्न केले, संपूर्ण ब्रह्मांडाची ताकद पणाला लावली, तरी मृत शरीरात एका सेकंदासाठीही प्राण आणता येत नाहीत. म्हणजेच जीवन अनमोल आहे. ते संपविण्याचा अधिकार आपल्याला स्वतःला पण नाही, कारण हे जीवन पालकांची देन आहे. दरवर्षी १० सप्टेंबर रोजी 'विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवस' जगभरात जनजागृतीसाठी साजरा केला जातो. लोकांच्या मनातील आत्महत्येसारखे वाईट विचार दूर करून सुखद आणि सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करण्यावर भर देणे हा त्याचा उद्देश आहे. 'आत्महत्येबद्दलचा विचार बदलूया आणि संवादाची सुरुवात करूया' ही त्याची संकल्पना असून, २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी हीच संकल्पना ठेवण्यात आली आहे.

आजच्या आधुनिक युगात आत्महत्यांच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आपल्याला संकेत देत आहे की, आपण अनुचित वातावरणात वावरतोय. आत्महत्येची कारणे जसे की - मानसिक आरोग्याच्या समस्या, मानसिक खेळांचे बळी ठरणे, एकटेपणा आणि कमकुवत होत चाललेले सामाजिक संबंध, अपयश, शिक्षण आणि करिअरचा दबाव, आर्थिक असुरक्षितता, फसवणूक, भीती, नातेसंबंध तुटणे, सामाजिक तुलना आणि डिजिटल दबाव, हिंसा, गैरवर्तन आणि भेदभाव, मादक पदार्थांचे सेवन किंवा वाईट व्यसन, खोटे देखावे करण्याची सवय, शरीरात किंवा मनात दीर्घकाळ राहणाऱ्या वेदना आणि आजार. अशा अनेक कारणांमुळे आत्महत्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. यात लवकरच सुधारणा करणे आवश्यक आहे.

जेव्हा आत्महत्या होते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा जीव जात नाही, तर त्या कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, कार्यस्थळी, समाजात आणि संबंधित संपूर्ण समुदायामध्ये कायमस्वरूपी एक जागा रिकामी होते; तसेच सामाजिक, भावनिक आणि आर्थिक परिणाम होतात. आत्महत्या रोखण्यासाठी परस्पर संबंधांमध्ये सहानुभूतीपूर्वक संवादाला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गैरसमज दूर करणे, समस्या सांगणे, मोकळेपणाने आपले म्हणणे मांडणे, सहानुभूती आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सरकार आणि सामाजिक संस्थांनीही समाजात आनंददायक, सकारात्मक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी अमूल्य भूमिका बजावली पाहिजे.

ज्या देशात किंवा समाजात अधिक समस्या आणि अडचणी असतात, तेथील वातावरणात राहणारे लोक अधिक आत्महत्या आणि गुन्हे करतात, कारण जगण्यासाठी अधिक संघर्षाचा सामना करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य ॲटलस २०२४ अहवालानुसार, वर्ष २०२१ मध्ये आत्महत्येमुळे ७,२७,००० मृत्यू झाले. तरुणांमध्ये मृत्यूचे तिसरे सर्वात मोठे कारण आत्महत्या हेच आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या आत्महत्या हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्र सरकारच्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२३ मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली, तर संपूर्ण भारतात १०,७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

अनेक वेळा आपल्याला माहीत असते की, एखादी गोष्ट आपल्यासाठी नुकसानकारक आहे, तरीही आपण सुधारत नाही. पुष्कळदा छोट्या-छोट्या निरुपयोगी गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते, ज्याचा थेट वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. आजकाल स्वतःला दुःख देण्यासाठी आपण स्वतःच अधिक जबाबदार आहोत. लवकर राग येणे, मनासारखे काम न झाल्यास आपला संयम गमावणे, इतरांना दोष देणे किंवा द्वेष करणे, इतरांवर आंधळा विश्वास ठेवणे, भावनांच्या भरात वाहून जाणे, स्वार्थ, लोभ, खोटा देखावा करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही तो देखावा कायम ठेवणे, समाधानाचा अभाव, सतत जीवनाच्या स्पर्धेत धावत राहणे, वाईट संगत, इतरांच्या आनंदात दुःखी होणे आणि दुःखात आनंदी होणे, मत्सर, लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवणे, परावलंबी असणे, मानसिक खेळांचे बळी ठरणे, मेहनतीपासून दूर पळणे आणि शॉर्टकटचा अवलंब करणे अशा अनेक गोष्टी माणसाने स्वतःच निर्माण केलेल्या आहेत. माणूस इच्छित असल्यास या गोष्टींवर नियंत्रण ठेवून अधिक चांगले, आरोग्यदायी आणि समाधानी जीवन जगता येऊ शकते. आपल्या चुकांचे परिणामच अनेकदा आपल्याला आत्महत्येच्या विचारांपर्यंत घेऊन जातात. त्यामुळे असे काम किंवा वर्तन करावे, ज्यामुळे आपण अडचणी आणि चुकांपासून दूर राहू शकू.

इतरांवर लगेच विश्वास ठेवू नका, कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नका. परिस्थितीनुसार आपल्या कामात परिवर्तनशीलता आणा, कौशल्ये शिका. गडद मनोवैज्ञानिक खेळ खेळणाऱ्या लोकांपासून दूर राहा. खोट्या देखाव्यापासून दूर राहा, व्यसनांपासून दूर राहा, वाईट संगत करू नका. पश्चात्ताप करण्यात वेळ वाया घालवू नका; आता काय चांगले करता येईल, याचा विचार करा. चांगल्या लोकांच्या संपर्कात राहा, जे प्रतिकूल परिस्थितीतही तुमची साथ देतील. आधुनिकता आणि सोशल मीडियाचे व्यसन लागू देऊ नका. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा, परिणामांचा अंदाज घ्या आणि त्यानंतर कृती करा. तीव्र राग, भावना किंवा जोशाच्या भरात अनुचित निर्णय घेण्यापासून दूर राहा. आधुनिक जीवनशैली मानवी जीवनासाठी शाप ठरत आहे, तिचे अंधानुकरण करू नका. समाधानी राहा, मेहनतीवर विश्वास ठेवा, आपल्या इच्छा इतरांवर लादू नका, दररोज स्वतःसाठी वेळ काढा, आरोग्यदायी छंदांना प्राधान्य द्या.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी दररोज व्यायाम करा. निसर्ग, पर्यावरण, पशू-पक्ष्यांचे संरक्षण आणि परोपकाराची भावना जागृत करा, असहाय्यांना मदत करा. आयुष्य नवचैतन्याने जगायचे आहे, केवळ वेळ घालवायचा नाही आहे. चारित्र्य जपा, आपल्या माणसांच्या प्रेमाची, भावनांची कदर करा आणि आपल्या अनमोल जीवनाचे मोल समजून घ्या. आपल्या कृतीमुळे कधीही कोणाला त्रास होऊ नये, अशा जीवनाचा निर्धार करा. जर आपण अनुचित काम करत नसू, तर लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कोणतेही काम छोटे-मोठे नसते. इतरांच्या आनंदात आनंदी होणे आणि इतरांच्या दुःखात त्यांच्या वेदना वाटून घेणे हीच माणुसकी आहे, हेच मानवाचे कर्तव्य आहे. अशा सवयी आणि वातावरणात जगणारी व्यक्ती नेहमी सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत असते, ती त्रास आणि अडचणींपासून पळून जात नाही, तर त्यांचा ठामपणे सामना करते. ती नेहमी शांत, सजग, समाधानी आणि प्रसन्न राहते आणि आपल्यालाही असेच जगायचे आहे.

लुई ब्रेल, अब्राहम लिंकन, फ्लोरेन्स नाइटिंगेल, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, थॉमस एडिसन, अलेक्झांडर ग्रॅहम बेल, मेरी क्युरी, डॉ. बी. आर. आंबेडकर, श्रीनिवास रामानुजन, चार्ली चॅप्लिन, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, ए. पी. जे. अब्दुल कलाम, दशरथ मांझी, बचेंद्री पाल, सिंधुताई सपकाळ, अरुणिमा सिन्हा, मलाला युसुफझाई, निक वुजिसिक, तुळशी गौडा, सोनम वांगचुक, मेरी कोम यांसारखे असंख्य लोक होऊन गेले आणि आजही आहेत, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून संघर्षमय जीवनाला एक आदर्श बनविले आणि जगात मार्गदर्शक म्हणून प्रकाशमान झाले.

तणावामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात किंवा इतर गंभीर आजारांच्या समस्या वेगाने वाढत आहेत. कोणत्याही समस्येचा ताण घेऊ नका. तणाव व्यवस्थापनाची कला आपण आपल्या देशातील नेत्यांकडून शिकली पाहिजे. अतिसामान्य ग्रामीण व्यक्ती, साधारण कद-काठीचा, जवळजवळ अशिक्षित गरीब मजूर दशरथ मांझी यांनी कोणाच्याही मदतीशिवाय २२ वर्षांच्या अथक परिश्रमातून एकट्याने डोंगर कापून लोकांच्या सोयीसाठी रस्ता तयार केला. एवढ्या अडचणींमध्ये त्यांनी इतिहास घडविला, तर आपण आयुष्यात एवढ्या लवकर का हार स्वीकारायची? यश मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवा. आपल्या कामात छोटीशी मुंगीही कधी हार मानत नाही; मग आपण तर माणूस आहोत. आपला निर्धार आणि धैर्य बुलंद असेल तर आपणही नक्कीच जिंकू. अडचणी, अपयश किंवा दुःख आले, किंवा कधीही वाईट विचार त्रास देऊ लागले, तर एक गोष्ट लक्षात ठेवा की, जगात आपल्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थितीत लोक जगत आहेत आणि वेळ थांबत नाही. काळ बदलतोच; आपलाही काळ बदलेल नक्कीच.

**- (महाराष्ट्र शासनाद्वारे पुरस्कृत लेखक)- ०८२३७४१७०४१**

# अशी मुलं काय कामाची?

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)



हिंगणा परिसरात स्वतःचे घर असतांना सुद्धा फुटपाथवर बेवारस आयुष्य काढणाऱ्या नारायणरावांना कुठल्यातरी कारने धडक दिल्यानंतर माणुसकीच्या नात्याने नागपुरातील डॉ. हर्षल मोरे आणि काही नागरिकांनी मिळून मेडिकलच्या ट्रॉमा सेंटरमध्ये उपचारार्थ दाखल केले. पत्नी, दोन मुले आणि नातवंडे असे भरलेले कुटुंब असतांना नारायणरावांच्या वाट्याला असे फुटपाथवरचे जगणे का यावे? याबद्दलची वेदना नुकतीच स्थानिक वृत्तपत्रांतून झळकली आणि तळपायाची आग मस्तकात शिरावी असे झाले.

वास्तविक समाजमन विषण्ण करणारे नारायणरावांचे हे काही पहिले उदाहरण नाही. यापूर्वी सुद्धा समाज माध्यमांवर अशा वार्ता व्हायरल झाल्या आहेत. कुणी जन्मदात्या मायबापांना रस्त्यात सोडतात. कुणी तीर्थक्षेत्री सोडतात तर कुणी वृद्धाश्रमात पाठवतात. ग्रामीण भागात हे चित्र नगण्य असलं तरी, नागरी भागात अशा घटना सर्रास घडायला लागल्याने आपण खरेच सुसंस्कारित आहोत की स्वार्थी झालो आहोत? असा प्रश्न पडायला लागला आहे. उठ सूट भारतीय संस्कृतीचे गोडवे गाणारे आपण आपल्याच जन्मदात्यांप्रती असे वागायला लागतो, तेव्हा कुठे जाते आपले संस्कार आणि संस्कृती? एखाद्याने कुठली चूक केली तर त्याकडे बोट दाखवणारे आपण, आपल्या गुन्ह्यांवर मात्र पांघरुण का घालतो?

ज्या माता पित्यांनी आपल्याला जन्म दिला. हे जग दाखविले. पालन पोषण करून शिक्षण शिकविले. एखाद्यावेळी आपली तब्येत बिघडली तर रात्र रात्र जागून काढली. इतकेच नव्हे तर, आपले मलमूत्र देखिल काढले. आपल्या वाट्याला आलेले दुःख आपल्या पाल्याच्या वाट्याला न यावे म्हणून स्वतःच्या स्वास्थ्याचा विचार न करता दिवसरात्र सतत राबले आणि आपल्या भविष्यासाठी काही जमापूंजी करून ठेवली. मात्र, आपण त्यांना काय दिलं? वृद्धाश्रमाचा किंवा फुटपाथवरच्या बेवारस जगण्याचा रस्ता! एखादेवेळी उतारवयात त्यांच्याकडून एखादी चूक झालीही समजा. मग, त्यामुळे त्यांच्याशी असे वागायला हवे? समाज माध्यमांवर तर सूनच नाही तर मुलं आणि मुली सुद्धा आपल्या वृद्ध आई वडिलांची हेळसांड करत असल्याचे व्हिडिओ कित्येकदा बघायला मिळतात. ज्यांना आई वडील आहेत त्यांना त्यांची किंमत नाही आणि ज्यांना नाहीत त्यांना याची सल आहे, असेच विरोधाभासी चित्र सध्या समाजात सर्वत्र बघायला मिळते आहे.

याला पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण म्हणायचे की संपत्तीचा हव्यास? की चित्रपटांत दाखविले जाते त्याचे अनुकरण? याचे उत्तर स्वतःच शोधले तर नक्की मिळेल. सांगायचे झाल्यास एक प्रकारे आपणच आपल्यासाठी खड्डा खोदून ठेवतो आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. करावे तसे भरावे हा निसगार्चा नियम सर्वांनाच लागू पडतो तरीही माणूस इतका कृतघ्नपणे कसा काय वागू शकतो? याचे उत्तर ज्याने त्याने आपल्यापरीने शोधणे गरजेचे आहे.

जानेवारी २०२४ च्या एका घटनेने तर समाजमन हेलावून निघाले होते. तब्बल चारशे पुस्तकांचे लेखन करणारे वाराणसी येथील प्रसिद्ध साहित्यिक श्रीनाथ खंडेलवाल यांची तब्बल ८० कोटी रुपयांची संपत्ती बळकावून सुद्धा मुलांनी अंत्यसंस्कारास नकार द्यावा याला कृतघ्नपणाचा कळस नाही म्हणावा तर काय? कोट्यवधीची संपत्ती असूनही खंडेलवाल यांनी शेवटचा श्वास एका वृद्धाश्रमात घेतला. आपल्या लेखणीच्या माध्यमातून जगाला मार्ग दाखविणाऱ्या खंडेलवाल यांना आपल्याच मुलांना मार्ग दाखवता आला नाही, याची सल अंतरी घेऊनच त्यांनी जग सोडले असेच म्हणावे लागेल. दोन मुलांपैकी एक मुलगा व्यावसायिक आणि मुलगी वकील असूनही वडिलांच्या संपत्तीवर डोळा ठेवून ती बळकावून घ्यावी आणि त्या उपरांतही त्यांच्या वाट्याला वृद्धाश्रम यावा म्हणजे किती कठोर हृदय म्हणायचे? पाल्याच्या पायाला साधा काटा रुतला तरी मायबापांना दुःख होतं. इथे तर पाल्यच जन्मदात्यांना नरक यातना देताहेत.

विशेष म्हणजे खंडेलवाल यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. अशा थोर विभूतींच्या वाट्याला अशा वेदना येत असतील तर सर्वसामान्य जणांचे तर विचारायलाच नको.

मूळचे हरियाणाचे आणि सध्या मुंबईत वास्तव्याला असणारे शिवचरण गुप्ता यांच्याही नशिबी असेच भोग आले. नुकतेच याच महिन्यात त्यांचे निधन झाले. गुप्ता यांना तीन मुली. तिघींचेही लग्न झालेले आहेत. मुलींच्या पालन पोषणावर त्यांना काय काय करावे लागले हे त्यांनाच ठाऊक. मात्र, आधी पत्नी वारली त्याहीवेळी आणि आता गुप्ता यांचे हरिद्वार येथे निधन झाल्यावरही तीन पैकी एकाही मुलीने अंत्यदर्शनासाठी येणे टाळावे याला काय म्हणावे. इतकेच नाही तर निरोप धाडणाऱ्यांना या मुलींनी सरळ सांगून द्यावे की, "अंत्यसंस्कार तुम्हीच निपटवून घ्या! चिता कधी जळणार आहे, आम्हाला जेवायचे आहे!" हा कृतघ्नपणा ऐकून खरेच आई वडिलांच्या आत्म्याला शांती मिळाली असेल काय? आज आपण आपल्याच जन्मदात्यांशी असे वागतो. उद्या आपल्याही पोटी लेकरे आहेत, याची जराशी जाणीव तर ठेवायला हवी. गावातील एखादा परक्या जाती धर्मातील व्यक्ती मरण पावल्यावर सुद्धा लोकं अंत्ययात्रेला जातात. इथे तर पोटच्या गोळ्यांनीच आई वडिलांचे अंत्यदर्शन नाकारले आहे. हीच परिस्थिती असेल तर यापेक्षा निपुत्रिक राहिलेले केव्हाही बरे.

ज्यांच्यासाठी आई वडिलांनी काबाडकष्ट करायचे. त्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी कर्जबाजारी व्हायचे. त्यांचे भवितव्य घडावे म्हणून काटकसर करून सोय करून ठेवायची. मात्र, इतके सारे करूनही मुलांना उतरंडीला आई वडील नकोसे वाटत असतील तर, अशी मुलं मुली काय कामाची? रोज समाज माध्यमांवर असे करायला हवे, तसे करायला हवे असे ज्ञान पाजळणारी पिढी आपल्या स्वतःच्या कर्तव्याला मात्र कसे विसरून जातात, हेच कळत नाही.

**- ८४१२८७७२२०**

# गणेशोत्सव: केवळ उत्साहाचा नाही, तर 'सुरक्षित व हरित' जागरुकतेचा उत्सव!





योगेश विटनकर,
उपमुख्यमंत्री जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर

'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या गजराने अवघा महाराष्ट्र दुमदुमून जाणार आहे. गल्लोगल्ली उभारलेले भव्य मंडप, आकर्षक देखावे आणि नयनरम्य रोषणाई यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. या उत्सवाला तेज देणारी वीज जितकी महत्त्वाची आहे, तितकीच तिची सुरक्षा आणि पर्यावरणपूरक वापर ही आजच्या काळाची मोठी गरज बनली आहे. यंदाच्या गणेशोत्सवात सुरक्षेसोबतच हरित ऊर्जेचा वापर करून हा उत्सव खऱ्या अर्थाने निर्विघ्न आणि पर्यावरणस्नेही साजरा करणे शक्य आहे.

विघ्नहर्त्याच्या उत्सवात पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. यासाठी गणेश मंडळांनी हरित ऊर्जेचा अधिकाधिक वापर करून एक नवा आदर्श निर्माण करायला हवा. मंडपातील रोषणाई व देखाव्यांसाठी शक्य असल्यास तात्पुरत्या सोलर पॅनेल्सचा वापर करावा, ज्यामुळे पारंपरिक विजेचा वापर कमी होईल. नेहमीच्या दिव्यांऐवजी १०० टक्के ऊर्जाबचत करणाऱ्या एलईडी रोषणाईला प्राधान्य दिल्यास विजेची मोठी बचत होते व उष्णताही कमी निर्माण होते. तसेच देखाव्यांमध्ये थमाकोल किंवा प्लास्टिक ऐवजी कापडी व कागदी सजावट आणि सौरऊर्जेवर चालणाऱ्या दिव्यांचा वापर करून गणेशोत्सव अधिक पर्यावरणस्नेही बनवता येईल.

उत्सवाचा आनंद द्विगुणीत करताना अपघातांना टाळण्यासाठी गणेश मंडळांनी सुरक्षेचे नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे. तात्पुरत्या वीज जोडणीसाठी महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, पोलिसांची परवानगी, वीज मागणी अर्ज आणि वीजसंच मांडणी अहवाल महावितरणकडे सादर करणे अनिवार्य आहे. मंडप, कमानी व रोषणाई उभारताना उच्च व लघुदाब विद्युत वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर्सपासून सुरक्षित अंतर ठेवले पाहिजे. विजेची सर्व कामे फक्त मान्यताप्राप्त व अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घ्यावीत. कामात योग्य क्षमतेचे आय. एस.आय. मार्क वायर्स, इन्सुलेशन आणि ईएलसीबी सारख्या सर्किट ब्रेकर्सचा वापर करावा, जेणेकरून शॉर्ट सर्किटचा धोका टळेल. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी मंडपात महावितरणच्या स्थानिक अभियंत्यांचे संपर्क क्रमांक ठळकपणे नोंदवून ठेवावेत.

या काळात महावितरणने देखील गणेश मंडळांना मोठा दिलासा दिला आहे. राज्य वीज नियामक आयोगाच्या निर्णयानुसार मंडळांना तात्पुरत्या वीज जोडणीसाठी घरगुती वापराचा दर लागू करण्यात आला आहे, ज्यामुळे आर्थिक भार कमी होईल. तसेच स्मार्ट मीटरसाठी भरावयाची अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून, उत्सव संपताच उर्वरित रक्कम त्वरित ऑनलाईन स्वरूपात परत केली जाईल.

गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांनीही सुरक्षेची खबरदारी घेणे गरजेचे आहे. पावसाळ्याचे दिवस असल्याने ओल्या हातांनी कोणत्याही विद्युत उपकरणांना किंवा दिव्यांच्या माळांना स्पर्श करू नये. मंडपात कुठेही उघड्या किंवा लटकणाऱ्या तारा दिसल्यास त्वरित कार्यकर्त्यांना किंवा महावितरणला सांगावे आणि लहान मुलांना विजेच्या उपकरणांपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे.

गणपती बाप्पा हे विघ्नहर्ता आहेत. त्यांच्या या गुणाला स्मरून आपण सर्वांनी सुरक्षेचे नियम पाळले आणि हरित ऊर्जेचा अंगीकार केला, तर हा उत्सव खऱ्या अर्थाने प्रकाशमय आणि मंगलमय होईल. यंदाच्या गणेशोत्सवात संकल्प करूया, सुरक्षित वीज, हरित ऊर्जा आणि आनंदाची रोषणाई!

# बैलपोळा : श्रमसंस्कृतीचा आनंदोत्सव

शशिकांत म.तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ

संपूर्ण श्रावण मास भगवान शिवाची उपासना करण्यासाठी मोठा पर्वणी काळ ठरतो. श्रावणात नैसर्गिक संपदेने नटलेल्या डोंगराळ भागात असलेली टुमदार शिवालयं शिवभक्तांच्या गर्दीमुळे फुलून जातात. भल्या पहाटे शिवनामाचा गजर, शिवस्तुती, महामृत्यूजंय मंत्राने मने प्रसन्न होतात. शंख, ढोल, घंट्याच्या निनादाने पावले शिवालयाची वाट धरतात.बघता-बघता संपूर्ण श्रावण महिना कधी संपून जातो, ते सुद्धा कळत नाही. श्रावण महिन्यातील अमावस्येला बैल पोळ्याचा सण साजरा केला जातो.धार्मिक रिवाजानुसार बैल (नंदी) हे भगवान शिवांचे वाहन होय. म्हणून शिवालयात शिवपिंडी समोर असलेला प्रतिकात्मक नंदी नेहमीच श्रद्धापूर्वक पूजनीय ठरतो.

बैलाला बारोमास प्रतिकात्मकारित्या पूजनीय मानले जात असले तरी सन्मानाने त्याच्या कष्टाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बळीराजा शेतकरी हा बैल पोळा सणाची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्षभर खाचखळगे, काट्या-गोट्यातून चिखल-ऊन -वारा पावसाची तमा न बाळगता राबराब राबणाऱ्या बैलाप्रति आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे श्रावण पिठोरी अमावस्या होय. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा वगळता बैलपोळा सण हा भाद्रपद अमावस्येला साजरा होतो. पोळ्याचा हा दिवस बैलांसाठी संपूर्ण विश्रांतीचा दिवस असतो. पोळ्याच्या आधीच्या दिवशी बैलांना आमंत्रण दिले जाते. पोळ्याला पहाटे नदीवर अथवा ओढ्यावर नेऊन त्याची अंघोळ घालतात. बैलांच्या खाद्यां ला हळद तेल व तुपाने अथवा तुपाने शेकतात. त्याला खांदे शेकणे असे म्हणतात. त्याच्या पाठीवर नक्षीदार झूल सोडून सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्यावर बाशिंग, गळ्यात घुंगरा-कवड्यांच्या माळा, नवे वेसण, नवा कासरा, पायात करदोड्याचे तोडे तर,नैवेद्य म्हणून खायला पुरणपोळीचा व सुग्रास अन्नाचा बेत असतो. एवढेच नव्हे तर बैलांची वर्षभर निगा राखणाऱ्या घरगड्यास नवीन वस्त्रांची भेट सुद्धा दिली जाते. या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह असतो. आपली बैल जोडी भरल्या पोळ्यात उठून दिसावी म्हणून, शेतकरी आपल्या ऐपती



प्रमाणे त्याचा साजश्रृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात.

गावाच्या सीमेजवळ आखरावर आंब्याच्या पानाचे तोरण करून बांधतात. गावातील सजविलेल्या सर्व बैल जोड्या वाजंत्री, सनई, ढोलताशे पारंपारिक वाद्य वाजवून एकत्र आणतात. हळूहळू पोळा भरल्यावर रंगत येते ते झडत्या म्हणण्याने.. 'झडत्या' म्हणजे लयबद्ध पद्धतीने प्रश्नोत्तरांच्या किंवा विनोदी उपरोधिक स्वरूपात म्हटल्या जाणाऱ्या लोकओव्या असतात. हे पोळ्यातील आगळे वेगळे आकर्षण असते.

'पोरा रे पोरा,पोरा रे पोरा..
बैलांच्या पाठीवर गवताचा भारा..
काल होती खांदमुई आज आहे,पोळा
म्हणून आपण इथ झाले हो गोळा..
बोला.. एक नमन..'

अशा प्रास्ताविक झडत्यातून झडत्या म्हणण्याची चुरस निर्माण होते. ज्यात शंकर-पार्वती, नंदीचा सन्मान करून त्याचे गुणगोडवे गायले जातात.वर्षभर बैलांची देखरेख करणाऱ्या सालगड्यांचे कौतुक या झडत्यातून होते.

'मनी रे मनी गळ्यात मनी..
सगळे खातात शेतकऱ्याच्या भरोशावर लोणी..
पण शेतकऱ्याचा कोणी नाही वाली..'

अशा उपरोधिक लोककाव्यातून शासन, प्रशासनाच्या आडमुठ धोरणांवर शाब्दिक आसूड ओढल्या जातात. शेतकरी कुटुंबाची कथा आणि व्यथा, नापिकी, कर्जबाजारी, आत्महत्या, दुष्काळ, अतिवृष्टी सारख्या अतिसंवेदनशील मुद्दे पोळ्याच्या झडत्याचे विषय असतात. पोळ्याच्या या आनंदोत्सोवात झडत्या च्या माध्यमाने सामाजिक संवाद साधला जातो. शेतकरी आस्थेने एकमेकांशी क्षेम खुशाली, विचारपूस करतात. पूर्वी मनोरंजनाची साधने मर्यादित होती. अशावेळी श्रमसंस्कृतीच्या आनंदोत्सोवात झडत्या मोठ्या मनोरंजन करीत असत. विविध विषयांना स्पर्श करीत हजरजबाबी बाण्याने झडत्या मौखिक असायच्या. पिढ्यानपिढ्या ऐकून आणि म्हणून त्यापुढे गेल्या ज्या आज डिजिटल युगात ग्रामिण संस्कृतीत कायम आहे.

'बैल चंद्राचा वंशज,बैल सूयार्चा वारस
बैल उगवता सूर्य
दे पिकांच्या हाती
शिवारात वारा
घरास उजळून जातो.'

अशा शब्दात कवी विठ्ठल वाघांनी बैलाला केवळ प्राणी न मानता शेतकऱ्यांच्या घराला प्रकाशाने उजळविणारा 'पुराणपुरुष' आणि 'शेतकऱ्याचा खरा सखा' म्हणून मांडले आहे.

- ९१३०८३५४५८

# शेतकऱ्यांचा उत्साहाचा आणि आनंदाचा सण बैलपोळा

रमेश लांजेवार
नागपूर

भारतीय संस्कृती ही पुरातन संस्कृती आहे. त्याचप्रमाणे भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही केली जातात. त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो.कारण पुर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची. श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजाअर्चना करून साजरा करतात. या सणाला पिठोरी अमावस्या, मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात. या दिवशी संपूर्ण शेतकरी बांधवांचा परिवार बैलांच्या सेवेत मग्न असतात. बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात.त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो.

या सणाची सुरूवात बैलपोळयाच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते. बैलपोळयाच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो. त्याच दिवशी म्हणजे बैलपोळयाच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात. कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात.म्हणुनच म्हणतात "कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर" अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा या उद्देशाने शेतकऱ्यांना बैलांपासून काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात. तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते. कारण वर्षभर नांगर, वखर, बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षभर शेतात राबराब राबतात. परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात. त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात.

खांदेशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात "आज आवतन घ्या उद्या जेवायला या" ज्याप्रमाणे



लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद लावून दुसऱ्या दिवशी सजवून बैलपोळ्याच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पध्दतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवुन वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळ्याच्या ठिकाणी एकत्र आणले जाते व प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देतात.या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णतः सुट्टी असते.

जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळयाच्या दिवशीच विश्रांती मिळते. यानंतर दुसऱ्याचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी बैलांचे महत्त्व लहान मुलांना समजावे या उद्देशाने लाकडाचे बैल सजवुन पोळ्यामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळ्यांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो. अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासुन तर बालगोपालांपर्यंत सर्वत्र बैलपोळ्याचा व तान्ह्या पोळ्याचा आनंद घेतांना दिसतात.अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते. त्यामुळे यात सर्वच मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळ्यात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो. अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबणाऱ्या व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतकऱ्यांचा खरा सोबती,सखा जिवलग मित्र म्हणजे बैल. त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे.

शेतकरी आपल्या पध्दतीने कष्ट करून शेती पिकवितात व संपूर्ण शेत हिरवागार गालिचाच्या रूपात आपल्याला दिसुन येते. त्यामुळे सर्वसामान्यांना, सामाजिक संस्थांना व सरकारला विनंती आहे की पोळ्याचे औचित्य साधून वृक्षारोपण केले पाहिजे. कारण देशातील बदलते हवामान व वाढता अलनिनोचा प्रभाव आणि २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमधील महाभयानक नैसर्गिक आपदांमुळे झालेली जिवीत हाणी लक्षात घेता वृक्षलागवड करून निसर्गाला वाचविने आपले प्रथम कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ यांचा नेहमीच सामना करावा लागतो आणि आता सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक भाग जलमग्न झाले आहे आणि अनेक शेतकऱ्यांची पीके पाण्याखाली आल्याने अत्यंत चिंतेत आहे व सध्याच्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे यात वित्तीय हानी व मानवीय हानी सुध्दा झाली आहे किंवा होत आहे.

अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना निसगार्पासुन ताबडतोब दिलासा मिळावा हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. त्याचप्रमाणे देशात अती पाऊस, अती उष्णता, सुनामी, भूकंप, ग्लेशियर वितळने, भुस्कखलन, ढगफुटी, ज्वालामुखीचा उद्रेक,नद्यांना महापुर इत्यादी भयावह घटना बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. यामुळे राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय हानी होत आहे. त्यावर फुंकर घालण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व गुरांना चारा मिळेल, सर्वांना शुध्द हवा मिळेल, ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मदत होईल व सृष्टी प्रफुल्लित राहील. बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा! जय जवान जय किसान!

- ९९२१६९०७७९

## बैलपोळा

पाऊस नाही, पिके सुकली,
शेतकऱ्याची आसही सुकली;
घरातले धान्य शेतात आले,
कर्जाचे डोंगर डोक्यावर चढले.

पीक येईल की नाही,
याची खात्री राहिली नाही;
तरी मातीशी नाते जपताना,
शेतकरी थांबला नाही.

खांद्यावर नांगर घेऊन,
बैल राबतो उन्हातान्हात;
शेतकऱ्याच्या घामासोबत,
तोही झिजतो मातीत.

दोघांचे नाते जन्मोजन्मीचे,
एकमेकांच्या कष्टांचे साक्षी;
बैलाशिवाय शेती अपुरी,
शेतकऱ्याची कहाणीही अधुरी.

आज पोळ्याचा सण आला,
बैल सजला प्रेमाने;
पण शेतकऱ्याच्या डोळ्यांमध्ये,
पाऊस दाटला आसवांनी.

बैलाच्या कष्टांना नमन करूया,
शेतकऱ्याच्या दुःखाला समजून घेऊया;
पाऊस पडो, हिरवी होवो धरती,
शेतकरी राजाच्या घरी नांदो समृद्धी

**बैलपोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा...**

**- सौ. माधुरी धनोकार, अकोला (महाराष्ट्र)**



# महाराष्ट्राचा बळीराजाः पुजतो सर्जा-राजा!

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली,

श्रावण महिन्यात सणांची रेलचेल पहायला मिळते. अनेक सण या महिन्यात आपल्या भेटीला येतात. पावसाचे दिवस असल्याने सृष्टी आधीच हिरवाईचा शालू नेसून नव्या नवरीवानी सजलेली असते. संपूर्ण वातावरणात एक प्रकारचा गारवा पसरल्याने मानवी मन देखील ताजे तवाने झालेले असते. अशा या श्रावण महिन्यात आपण नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी यांसारखे सण साजरे करतो आणि या श्रावण महिन्याची सांगता होते ती श्रावण महिन्याच्या अखेरीस येणाऱ्या पोळा या सणाने! तो बैलपोळा व तान्हापोळा असा दोन दिवसांचा असतो. पोळ्याची गाणी-झडत्यांमुळे सानाथोरांचे खुप मनोरंजन होते-

पोया रे पोया, बैलांचा पोया।
तुरीच्या दायीने, मारला हो डोया।।
कांद्याने आमचे, केले हो वांदे।
ऊसवाला बाप, ढसा ढसा रडे।।
एक नमन गौरा पार्बती; हर बोला,
हर हर महादेव..!

श्रावण अमावस्येला अर्थात पिठोरी अमावस्येला शेतकरी बांधव आपल्या सर्जा-राजाचा हा सण अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतांना आपल्याला दिसतात. पुणे मुंबई यांसारखी मेट्रो शहरे या सणाविषयी कदाचीत अनभिज्ञ असावीत, एवढी ती वाढली आहेत. या शहरांची धावपळ पाहिली, की पोळा या सणाची यांना काही माहिती आहे की नाही, असे वाटते. परंतु या शहराच्या आसपासची गावे आणि संपूर्ण महाराष्ट्रात बळीराजा मात्र आपल्या जिवाभावाच्या सोबत्याचा हा सण अत्यंत पारंपारिक पध्दतीने आजही साजरा करतांना दिसतो. पोळा या सणाच्या आदल्या दिवशी बैलांना रितसर आमंत्रण देण्याची पध्दत आहे बरं का? शेतकरी प्रेमाने बैलांना म्हणतो, की आज आवतन घ्या; उद्या जेवायला या! वरून झडती हाक-



वाटी रे वाटी खोबऱ्याची वाटी
महादेव रडे दोन पैश्यासाठी
पार्बतीच्या लुगड्याले छप्पन गाठी
देव कवा धावल गरिबांसाठी?
एक नमन गौरा पर्बती; हर बोला,
हर हर महादेव..!

असे आमंत्रण या बैलांना दिले जाते. दुसऱ्या दिवशी सकाळी बैलांना नदीवर नेले जाते, त्यांना झकास अंघोळ घालण्यात येते. घरी आणल्यावर त्यांच्या सर्वांगावर गेरूचे ठिपके दिले जातात. शिंगाना आरसे, चवारे, बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा घातल्या जातात. पायांमध्ये चांदीचे किंवा करदोड्याचे तोडे घालतात. नवी वेसण नवा कासरा घातल्यानंतर अंगावर रेशमी नक्षीकाम केलेली झूल पांघरली जाते. कैलासातील महादेवाच्या नंदीलाही लाजवेल, अशी बैलजोडी श्रृंगारली जाते. जनावरांचा गोठा स्वच्छ करण्यात येतो. घरातील सुवासीनी बैलांची विधीवत पूजा करतात. बैलांकडून पोळ्याच्या दिवशी कोणतेही काम करून घेतले जात नाही. गोडधोड, पुरणपोळीचा घास त्यांना भरवला जातो. बैलांची कायम निगा राखणाऱ्या बलक्याला- गड्याला नवे कपडे दिले जातात. बालपणी आपण त्यांच्या सजण्याचे वर्णन कवितेतून वाचत होतो-

शिंगे रंगविली, बाशिंगे बांधली!
चढविल्या झूली, ऐनेदार!!

बैलांचे जेवण झाल्यानंतर सायंकाळी त्यांना गावाबाहेर मंदिरात नेले जाते. सर्व शेतकरी आपापल्या जोड्या घेऊन असल्यास मारुतीच्या मंदिराजवळ किंवा एका ठिकाणी एकत्र येतात. आंब्याच्या पानांचे तोरण बांधून बैलांना रांगेत उभे करण्यात येते. ढोल, ताशे, नगारे आदी वाद्य वाजवले जातात. झडत्या- पोळ्याची गाणी म्हटली जातात. येथे बैलांच्या शर्यती देखील आयोजित केल्या जातात. ज्याच्या जोडीला सर्वात चांगले तयार केले वा सजवले असेल, त्या जोडीला पारितोषीक दिले जाते. आपापल्या गावातील परंपरेनुसार उत्सव साजरा झाल्यानंतर किंवा पोळा फुटल्यानंतर कार्यक्रम संपन्न होतो. घरी निघतांना बैलांना घरोघरी नेल्या जाते. तेथे आयाबाया बैलांची पूजा करतात. बैल नेणाऱ्यास बोजारा- पैसे देण्याची प्रथा रुढ आहे. हिंदू संस्कृतीत वृक्षांप्रमाणेच वन्यजिवांना देखील पुजनीय मानल्या जाते. झडती खुणावते-

पोळा रे पोळा,
पाऊस झाला भोळा!
शेतकरी हीतासाठी,
सगळे व्हा गोळा!
एक नमन गौरा पर्बती; हर बोला,
हर हर महादेव..!

वर्षभर शेतात शेतकऱ्यासमवेत बरोबरीने राबणाऱ्या बैलांप्रती एक दिवस उतराई होण्याची संधी म्हणून पोळा या सणाकडे आपण पाहातो. पूर्वापार चालत आलेल्या रूढी परंपरांप्रमाणे हे उत्सव आजही गावागावांमधून उत्साहात साजरे होतांना आपल्याला दिसतात. बैलपोळा सर्व शेतकरी बांधवांना सुख समृद्धीवर्धक ठरो!

- ७७७५०४१०८६

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## सचिन बेंडभर यांच्या 'हत्तीची सहल' या काव्यसंग्रहास पुरस्कार



**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

शिक्षक संजीवनी या मासिकातर्फे दरवर्षी उत्कृष्ट साहित्य निर्मितीला पुरस्कार दिले जातात. यावर्षी हा पुरस्कार संस्कृती प्रकाशनने प्रकाशित केलेल्या सचिन बेंडभर यांच्या हत्तीची सहल या बाल काव्यसंग्रहास उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार प्रसिद्ध बाल साहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुणे येथील पत्रकार भवन येथे प्रदान करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक दिलीप फलटणकर, स्वाती महालंक, माधुरी गोखले, भालचंद्र कुलकर्णी, अविनाश सकुंडे, दिलीप गरुड, श्रुती कुलकर्णी, संपादक देविदास लिमजे आणि कार्यकारी संपादक डॉ. संजय जगताप आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुणे येथील शिक्षक संजीवनी मासिकातर्फे मराठी साहित्यातील बालसाहित्य या विभागात दरवर्षी साहित्यिकांच्या साहित्यकृतींना पुरस्कार दिले जातात. यावर्षी बालसाहित्य विभागात पिंपळे जगताप ता.शिरूर येथील सचिन बेंडभर यांच्या हत्तीची सहल या संस्कृती प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या बालकाव्यसंग्रहाला प्रसिद्ध कवी व साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार विजेते साहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या हस्ते पुणे येथील पत्रकार भवन येथे प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र, शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सचिन बेंडभर यांच्या काव्यसंग्रहास २०२६ सालचा हा पहिलाच सन्मान असून निवड समितीने एकमताने या काव्यसंग्रहाची निवड केली आहे. हत्तीची सहल या काव्यसंग्रहात लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कविता असून त्यांच्या ज्ञानात भर पडेल अशा प्रेरक कवितांचा समावेश आहे. लहान बाल चमुंसाठी संस्काराची शिदोरी म्हणजे सचिन बेंडभर पाटील यांचा हत्तीची सहल हा काव्यसंग्रह! संस्कृती प्रकाशनने हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून प्रसिद्ध चित्रकार प्रतीक काटे यांनी विषयाला अनुरूप चित्रे व आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. प्रसिद्ध बालसाहित्यिका संगीता बर्वे यांनी या पुस्तकाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. तर बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी या पुस्तकाची पाठराखण केली आहे. सचिन बेंडभर यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्मार्ट प्रोक्युअरमेंटमुळे व्यवसायाच्या नफ्यात थेट वाढ शक्य : डॉ. स्वर गट्टानी




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

योग्य पद्धतीने केलेली खरेदी अर्थात 'स्मार्ट प्रोक्युअरमेंट' ही व्यवसायाच्या नफ्यात थेट वाढ करण्याचे प्रभावी साधन ठरू शकते, असे प्रतिपादन Kraya.io चे सहसंस्थापक डॉ. स्वर गट्टानी यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे नागपूरच्या सिव्हिल लाइन्स येथील चिटणवीस सेंटरमध्ये सर्वोत्तम किमतीपलीकडे या विषयावर आयोजित सत्रात ते बोलत होते. खरेदी करताना केवळ सर्वात कमी दर मिळविण्यावर भर न देता, क्रेडिट सुविधा, वितरणाचा कालावधी, वाहतूक खर्च, वॉरंटी, पेमेंटच्या अटी, उत्पादनाची गुणवत्ता आणि पुरवठादाराची विश्वासार्हता यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे, असे डॉ. गट्टानी यांनी सांगितले. ह्यसर्वात स्वस्त दर म्हणजे नेहमीच सर्वात कमी खर्च असेलच असे नाही; त्यामुळे केवळ किंमतीवर नव्हे, तर संपूर्ण व्यवहारासंदर्भात वाटाघाटी करावी, हा संदेश त्यांनी दिला.

विश्वसनीय पुरवठादारांकडे केवळ कोटेशन देणारे विक्रेते म्हणून न पाहता व्यवसायातील भागीदार म्हणून पाहणे गरजेचे आहे. उत्पादनाचे वेळापत्रक, नियमित अभिप्राय आणि विश्वासार्ह कामगिरीला प्रोत्साहन दिल्यास जलद वितरण, लवचिक क्रेडिट आणि आवश्यकतेनुसार प्राधान्याने पुरवठा मिळू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. वाटाघाटीपूर्वी मागील खरेदी दर, बाजारभाव, पयार्यी पुरवठादार, आवश्यक प्रमाण, वितरण कालावधी आणि पुरवठादाराची कामगिरी यांचा अभ्यास करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. सत्राचे सूत्रसंचालन अमोल घाडगे यांनी केले, तर श्री प्रसाद दुबे यांनी समन्वय साधला. प्रत्येक खरेदीपूर्वी काय, कधी, किती महत्त्वाचे, विलंब झाल्यास काय आणि व्यवसायाचा वास्तविक खर्च किती या पाच प्रश्नांचा विचार करण्याचे आवाहन करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने १६ नोव्हेंबर, २०२६ पासून सुरू होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी, तसेच बालनाट्य आणि दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. सांस्कृतिक कार्य संचालक प्रशांत खेडेकर यांनी ही माहिती दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडणार आहे. या स्पर्धेत २३ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पधेर्ची प्राथमिक फेरी १० केंद्रांवर, तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पधेर्ची अंतिम फेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२६ पासून आयोजित करण्यात येईल. नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी स्पर्धेत सहभागी झालेल्या संस्थांना विहित नमुन्यातील प्रवेशिका व नियम https://mahanatyaspardha.com या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेशिका २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास किंवा अपूर्ण माहिती भरल्यास ऑनलाईन अर्ज सादर करता येणार नाही.

## गट ग्रामपंचायत घोटमुंढरी येथील जि.प शाळेच्या सभेत नवनियुक्त ग्रा.पं सचिव हरीष धार्मिक यांचा सत्कार व शाळेतील समस्यांचे निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

गट ग्रामपंचायत कार्यालय घोटमुंढरी येथील नवनियुक्त सचिव हरिष धार्मिक तसेच गट ग्रामपंचायत सर्व कमिटी, तिन्ही गावचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जिल्हा परिषद आदर्श शाळा घोटमुंढरी या शाळेत निमंत्रण देऊन तिन्ही गावच्या शाळा सुधार,भौतिक सुविधा, गरजा, अडचणी साधक बाधक मार्गाने चर्चा करून त्यावर उपाय योजना करून दूर करण्यासाठी शाळेच्या वतीने सभा आयोजित केलेली होती. त्यानिमित्ताने नवनियुक्त सचिव यांचे शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते स्वागत सत्कार करून शाळेतील समस्यांचे लेखी निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विकास धारगावे,अध्यक्ष उदय पांडे, उपाध्यक्ष मंगलसिंग देवतारे,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पटले, शिक्षक कांबळे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष धनसिंग पटले, ग्रामपंचायत सदस्य विलास पटले,अरविंद भोयर,शंकर पटले,मौसमी घरडे,पूजा पटले,संगीता चामट,मनोज चामट शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ढोलमारा, पिंटेश पटले, दीपंकर घरडे,कुणाल क्षीरसागर,कांचन पटले सह मान्यवर उपस्थित होते.

यांप्रसंगी शाळेतील संपूर्ण परिसर,शाळेचे सर्व वर्ग खोल्या, आय सी टी लॅब, एआय लॅब, शौचालय ,सांडपाणी, शाळेचे पटांगण इत्यादी ची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आणि ते ग्रामपंचायत चे माध्यमातून सोडवण्यासाठी चर्चा करण्यात आली. छोटे मुद्दे जे काही शाळेच्या बाबतीत आहेत ते येत्या आठ दिवसात आणि जे मोठे मुद्दे पेंटिंग, चित्रीकरण असे सर्व बाबी दिवाळीपर्यंत पूर्ण करून देण्याची सर्वांसमक्ष ग्वाही नवनियुक्त सचिव धार्मिक यांनी दिली. शाळेबद्दल सकारात्मक भूमिकेतून, विकास व सुधार आवश्यक समजून शाळेला प्राथमिक केंद्रबिंदू मानून आपले विचार मांडून मनोगत व्यक्त केले. शाळेबद्दलची सचिवांची भूमिका ऐकून त्यांची स्तुती केली.आभार प्रदर्शन शिक्षक मच्छिंद्र कांबळे यांनी केले.

# फ्लुइड पॉवर क्षेत्रात विदर्भाला मिळेल बळ : हेमंत कुमार

### फ्लुइड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या नागपूर चॅप्टरचे उद्घाटन




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

फ्लुइड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या नागपूर चॅप्टर शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि उद्योगातील व्यावसायिकांच्या उत्कृष्टतेसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. नागपूर व विदर्भाच्या गरजा लक्षात घेऊन प्रादेशिक पातळीवर हे चॅप्टर काम करेल आणि फ्लुइड पॉवर क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी योगदान देईल, असा विश्वास एफपीएसआय, बंगळुरूचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत कुमार यांनी व्यक्त केला.

फ्लुइड पॉवर इंजिनिअरिंगच्या क्षेत्रातील संशोधन, तांत्रिक उत्कृष्टता आणि उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सहकार्याला नवी दिशा देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या फ्लुइड पॉवर सोसायटी ऑफ इंडिया (एफपीएसआय)च्या नागपूर चॅप्टरच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. बुधवारी इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला एफआयई नागपूर चॅप्टरचे चेअरमन संदीप शिरखेडकर, एफपीएसआय नागपूर चॅप्टरचे चेअरमन जितेंद्र नायक, उपाध्यक्ष एस. सी. विश्वकर्मा व मिलिंद गद्रे तसेच डॉ. संजय इंगोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर डिजिटल पद्धतीने नागपूर चॅप्टरचे उद्घाटन करण्यात आले.

संदीप शिरखेडकर म्हणाले, सर्व क्षेत्रातील तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत असताना त्यानुसार अभ्यासक्रम मात्र उपलब्ध नाहीत. त्यामुळे फ्लुइड पॉवर क्षेत्रासाठी मध्य भारतात मोठ्या संधी आहेत. शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याची एफपीएसआय नागपूर चॅप्टरची भूमिका महत्त्वाची ठरेल. फ्लुइड पॉवर क्षेत्रा आतापर्यंत विविध उपक्रम राबवले जात होते; मात्र आता त्याला संस्थात्मक स्वरूप मिळाले असून इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सकडूनही सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

एस. सी. विश्वकर्मा यांनी नागपूर चॅप्टरच्या आगामी उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये ओरिएंटेशन व प्रशिक्षण कार्यक्रम, अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप, औद्योगिक प्रकल्पांचे प्रशिक्षण, तसेच उद्योगातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी विविध कार्यक्रमांचा समावेश असेल.

स्वागतपर भाषणातून जितेंद्र नायक यांनी नागपूर चॅप्टरच्या स्थापनेमागची भूमिका विशद केली. ते म्हणाले, विदर्भ हे खाण उद्योगाचे प्रमुख केंद्र असून नागपूर हे खाण क्षेत्रासाठी प्रवेशद्वार आहे. मात्र, फ्लुइड पॉवरसारख्या महत्त्वाच्या विषयासाठी आतापर्यंत स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध नव्हते. पण आता नागपूर चॅप्टरच्या माध्यमातून उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी केंद्रीय पातळीवर प्रात्यक्षिक प्रयोगशाळा तसेच भविष्यात सेंटर ऑफ एक्सलन्स उभारण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी गलांडे-देशपांडे यांनी केले. तर आभार मिलिंद गद्रे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इ. गुणशेखर आणि डॉ. राजूरकर यांचे सहकार्य लाभले. यावेळी अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ, व्यावसायिक, संशोधक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## ग्रामीण शिक्षणपद्धतीची दखल घेत इन्सुली शाळेचा सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, सावंतवाडी**
**गुरुनाथ तिरपणकर**



ग्रामीण भागातील शाळांमध्ये आजही शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता विविध उपक्रम राबवितात. मर्यादित साधनसामग्रीतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या शिक्षकांच्या कार्याची समाजाने दखल घेणे गरजेचे आहे. ग्रामीण शाळांमधील ही शिक्षणपद्धती आणि शिक्षकांची तळमळ समाजासमोर यावी, यासाठीच जनजागृती सेवा संस्थेने ग्रामीण भागातील शाळांची निवड करून शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम सुरू केला आहे, असे प्रतिपादन जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी इन्सुली येथे केले.

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा इन्सुली नं. ५ पागावाडी येथे जनजागृती सेवा संस्थेतर्फे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कायार्ची दखल घेत विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते शाळेचे मुख्याध्यापक भास्कर रामा माजगावकर, उपशिक्षक सुधीर राजाराम गावडे व हंसराज व्यंकटराव गवळे यांचा सन्मान करण्यात आला.

ग्रामीण भागातील शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मर्यादित सुविधा, स्थानिक परिस्थिती आणि विद्यार्थ्यांची विविध शैक्षणिक पार्श्वभूमी यांचा विचार करून शिक्षकांना अध्यापनाच्या विविध पद्धतींचा अवलंब करावा लागतो. अशा परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देत त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारे शिक्षक समाजासाठी प्रेरणादायी काम करीत आहेत. याच कार्याची दखल घेऊन संस्थेने इन्सुली नं. ५ पागावाडी शाळेची निवड केली.

**ग्रामीण शाळा ही केवळ शिक्षणाची नव्हे, तर संस्कारांची केंद्रे**

यावेळी रश्मी मुसळे साळगावकर म्हणाल्या, ग्रामीण शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकातील ज्ञानासोबतच संस्कार, शिस्त, सामाजिक जाणीव आणि स्थानिक संस्कृतीची ओळख दिली जाते. शिक्षक विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने जोडलेले असतात. त्यामुळे ग्रामीण शाळांमधील शिक्षणपद्धतीचे आणि शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक होणे आवश्यक आहे. अशा सन्मानातून शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळते.

**सन्मानामुळे कामाची जबाबदारी अधिक वाढते**

मुख्याध्यापक भास्कर माजगावकर यांनी संस्थेचे आभार मानताना सांगितले की, शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेपुरते तयार करणे हा आमचा उद्देश नसून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. ग्रामीण भागातील शाळेतील शिक्षकांच्या कामाची दखल घेऊन जनजागृती सेवा संस्थेने केलेला हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. या

**इन्सुली नं. ५ पागावाडी जि.प. शाळेत जनजागृती सेवा संस्थेतर्फे शिक्षकांचा गौरव**

सन्मानामुळे विद्यार्थ्यांसाठी आणखी चांगले काम करण्याची जबाबदारी वाढली आहे.

उपशिक्षक सुधीर गावडे व हंसराज गवळे यांनीही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नसून योग्य मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास ते विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, असे त्यांनी सांगितले.

या सन्मान सोहळ्यास पत्रकार नीलेश मोरजकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, पालक विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामीण भागातील शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी जनजागृती सेवा संस्थेने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, ग्रामीण शिक्षणव्यवस्थेतील सकारात्मक काम समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या माध्यमातून होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सचिव संचिता भंडारी आणि खजिनदार दत्ता कडुलकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

## स्थानिय लोकाधिकार सेना स्थापना सोहळा संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर -वर्धा जिल्हा स्थानीय लोकाधिकार सेना स्थापना सोहळा दिन ६ सप्टेंबरला शिवसेना नेते व माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या अध्यक्षतेखाली रविभवन नागपूर येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी राजाभाऊ रामद्वार यांची नागपूर-वर्धा जिल्हा स्थानीय लोकाधिकार सेना अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने स्थानीय लोकाधिकार सेना महासंघाचे सरचिटणीस अरुण मोरे, विधान परिषद आमदार कृपाल तुमाने, पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव, नागपूर जिल्हाप्रमुख व नगरसेवक सूरज गोजे, वर्धा जिल्हाप्रमुख प्रशांत शहागडकर, जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्यासह पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक उपस्थित होते. तसेच कार्याध्यक्ष सुनील चिमोटे, सरचिटणीस ललित घोंगे, चिटणीस गोपाल बिरे, खजिनदार अशोक जवंजाळ, उपाध्यक्ष चंद्रहास राऊत, मोरेश्वर पंचबुधे यांच्यासह विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# विक्रेते, ग्राहक यांना सावध राहण्याचा इशारा, परप्रांतीय बोगस लॉटरीचा सुळसुळाट!

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
**(गुरुनाथ तिरपणकर)**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर परप्रांतीय बोगस लॉटरीचा लवकरच सुळसुळाट होणार असून, लॉटरीचे ग्राहक व विक्रेते यांनी सावध राहावे; अन्यथा फसवणूक होण्याचे भय आहे, असा इशारा महाराष्ट्र राज्य लॉटरी विक्रेता संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष श्री. विलास कृ. सातार्डेकर यांनी दिला आहे.

लॉटरी विक्रेता संघटनेच्या राज्यव्यापी पदाधिकारी बैठकीनंतर संघटनेचे अध्यक्ष विलास सातार्डेकर पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, येत्या काळात लॉटरी उद्योगापुढे संकट म्हणून उभ्या ठाकणाऱ्या विविध घटनांकडे त्यांनी लक्ष वेधले असून, लॉटरीचे ग्राहक व विक्रेते यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

गणेशोत्सव, दिवाळी, नवरात्र, दसरा या सणांच्या निमित्ताने विविध प्रचारमाध्यमांतून वारेमाप जाहिराती ग्राहकांपुढे येत आहेत. अशा जाहिरातींवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करून लॉटरीच्या ग्राहकांना आकर्षित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू आहे. मात्र, हे परप्रांतीय दलाल, मुख्य वितरक व वितरक यांचे षड्यंत्र असून, त्यातून ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांनी खबरदारी घेणे ही काळाची गरज असल्याचे सातार्डेकर यांनी स्पष्ट



केले.

पाचशे रुपयांच्या तिकिटावर १ कोटी २५ लाख रुपये, ४०० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी २१ लाख रुपये, ३०० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी ११ लाख रुपये, २५० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी रुपये, ५०० रुपयांच्या तिकिटावर ३ कोटी रुपये, तसेच २५० रुपयांच्या तिकिटावर १ कोटी ५० लाख रुपये अशा भरमसाट बक्षिसांच्या रकमेची जाहिरात करण्यात येत आहे. मात्र, हे सर्व फसवे दावे आणि फसव्या बक्षिसांच्या रकमा आहेत. या चक्रात ग्राहकांनी तसेच विक्रेत्यांनीही फसू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र राज्यात ऑनलाइन लॉटरीला बंदी असूनही, कोणतीही परवानगी नसताना ऑनलाइन पेपर लॉटरी खुलेआम राज्यभर सुरू आहे. काही ठिकाणी पेपर लॉटरी थेट पोस्टाने तसेच कुरिअरद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. राज्य सरकार तसेच पोलीस खात्याला न जुमानता हा आर्थिक व्यवहार सुरू असल्याकडेही लॉटरी विक्रेता संघटनेने लक्ष वेधले आहे.

परप्रांतीय खलनायक दलाल विक्रेत्यांना खोटी आश्वासने व आमिषे दाखवून परप्रांतीय बोगस लॉटरी विक्रीसाठी विविध मार्गांनी दबाव आणत आहेत. मात्र, अनधिकृत असलेली ही लॉटरीची तिकिटे विक्रेत्यांनी अमान्य करावीत. काही ठिकाणी या बोगस लॉटरीचे अड्डे मटक्याप्रमाणे सुरू झाले आहेत. त्यामुळे अधिकृत राज्य लॉटरीची बदनामी होताना दिसत आहे.

दमदाटी करून लॉटरीची तिकिटे विक्री करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या गुंडांविरोधात विक्रेत्यांनी थेट लॉटरी संघटनेशी संपर्क साधावा आणि लॉटरी उद्योगाची प्रतिष्ठा व परंपरा शाबूत ठेवावी, असे कळकळीचे आवाहन विलास सातार्डेकर यांनी विक्रेत्यांना केले.

**महाराष्ट्र राज्य हा बोगस लॉटरीचा छापखाना बनला आहे काय?**

पोलीसांनाही न जुमानता खोटी-नाटी परवानगी दाखवून फसवणूक करणारे दलाल व वितरक हे कितीकाळ ग्राहक आणि विक्रेत्यांना वेठीस धरणार? बोगस कंपन्या, एजंट आणि दलाल यांच्यापुढे आपण शरणागती पत्करणार काय? कोट्यवधी रुपयांच्या बक्षिसांची तिकिटे महाराष्ट्रात विकून हा पैसा असाच परराज्यात जाणार काय? हे प्रश्न उपस्थित करून लॉटरी विक्रेत्यांनी आता सावध राहावे. तसेच, या परप्रांतीय लॉटरी ठेकेदारांना न घाबरता पारदर्शक पद्धतीने व्यवसाय करावा, असेही विलास सातार्डेकर यांनी स्पष्ट केले.

# बसची आई-चिमुकल्याला धडक, दोघांचीही प्रकृती चिंताजनक

## नागपुरातील गंगाबाई घाट परिसरातील घटना, संजय ट्रॅव्हल्स या खासगी कंपनीची बस, घटनेनंतर नागरिकांमध्ये रोष

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसने रस्त्याने जात असलेल्या महिलेसह तिच्यासोबत दुचाकीवर बसलेल्या चिमुकल्या मुलाला जोरदार धडक देत चाकाखाली चिरडण्याचा प्रयत्न केला. अपघात घडल्याचे दिसत असतानाही बस चालकाने बस न थांबवता खाली कोसळलेल्या महिलेला दूरपर्यंत फरफटत नेले.

या भीषण अपघातात गंभीर जखमी झालेल्या महिलेसह चिमुकल्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दोघांपैकी मुलाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून महिलेच्या हाताचे हाड मोडले आहे. दोघांचीही प्रकृती नाजूक असल्याचे वैद्यकीय सुत्रांनी स्पष्ट केले. दोघांवरही सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. दामिनी उथरा (३२) असे आईचे आणि रिशव उथरा (३) असे गंभीर जखमी चिमुकल्याचे नाव आहे. नंदनवन पोलीस हद्दीतील गंगाबाई घाट रोडवरील मां वैष्णोदेवी चौकाजवळ दुपारी एकच्या सुमारास हा भिषण अपघात झाला. दुचाकीवरील आई आणि चिमुकलीला धडक देणारी बस संजय ट्रॅव्हल्स या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या कंपनीची बस आहे. ही बस पारडीकडून घाटरोडच्या दिशेने जात होती. अपघात घडल्याच्या काही सेकंदापूर्वी ही बस सिग्नलवर थांबलेली होती. हिरवा दिवा लागताच बस सुरू झाली. बी बस ताशी आठ किलोमिटरच्या वेगाने पुढे जात असताना एक महिला आणि तिच्या सोबत दुचाकीवर उभा चिमुकला दोघेही णडाव्या बाजूने बसच्या समोर आल्या. त्याच वेळी महिलेचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर महिला दुचाकीसह बसच्या डाव्या चाकासमोर खाली घसरली.




प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार महिला पडली असल्याची जाणीव झाल्यानंतही बसचालकाने बस न थांबवता ती पुढे दामटवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महिला आणि तिच्या सोबतची चिमुकला बराच दुरपर्यंत फरफटत गेले. यात आई आणि चिमुकल्याला गंभीर दुखापती झाल्या. परिसरातून जाणाऱ्या नागरिकांनी गोंधळ घालत बस चालकाला थांबवले. त्यानंतर अवघ्या काही सेकंदात काही पोलिस कर्मचारी तिथे धावले. पोलिसांच्या देखत बस चालकाने नागरिकांना अरेरावीची भाषा केली. यातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे बसच्या आतील सीसीटीव्हीत संपूर्ण घटनाक्रम कैद झाला आहे. पोलिसांनी बसचालकाला ताब्यात घेतले असून चौकशी सुरू केली आहे.

# पाच गोवंशांची निर्दयतेने वाहतूक : साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांविरुद्ध गुन्हा

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
गोवंशांची निर्दयीपणे कोंबून अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या तिघांवर भिवापूर पोलिसांनी कारवाई केली. मोखाळा-भिवापूर मार्गावरील मोखाळा फाट्याजवळ बोलेरो अडवून पोलिसांनी पाच गोवंशांची सुटका केली. या कारवाईत वाहनासह तब्बल ४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




९ सप्टेंबर रोजी पोलिसांना गोवंशांची अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून महिंद्रा बोलेरो (एमएच ३५ एजे ५८०२) पकडली. वाहनाच्या मागील भागात पाच गोवंश अक्षरशः कोंबून ठेवण्यात आले होते. त्यांच्यासाठी चारापाणी किंवा अन्य कोणतीही व्यवस्था नसल्याचे आढळून आले.

या प्रकरणी चालक महेश शिवप्रसाद मोहारे (२७, मुंडीपार, सालेकसा, गोंदिया) याच्यासह चमनलाल नितलाल सिहोरे (२५, ब्राम्हणी, सालेकसा) आणि जयप्रकाश मदनलाल मछिया (३३, बडगाव, लांजी, बालाघाट) यांच्याविरुद्ध प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियमातील कलम ११(१)(ड), ११(१)(इ) व ११(१)(एफ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी बोलेरोची किंमत ३ लाख ५० हजार, तर पाच गोवंशांची किंमत १ लाख रुपये असा एकूण ४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी रवींद्र मस्कर यांच्या नेतृत्वात भिवापूर पोलिसांनी केली.

## फ्रेंड्स कॉलनीतील बुधवार बाजार गेल्या दोन आठवड्यापासून लावण्यात मनाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बाजार रोड, फ्रेंड्स कॉलनी, गंगानगर येथे दर बुधवारी भरणाऱ्या मोठ्या बाजारामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊन वाहतुकीची प्रचंड कोंडी होत होती. अत्यंत बिकट परिस्थितीमुळे आपत्कालीन (इमर्जन्सी) प्रसंगी नागरिकांना ये-जा करणे अशक्य होऊन मोठा त्रास सहन करावा लागत होता.

या समस्येची गंभीर दखल घेत नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोन पथकाने परिसरात धडक अतिक्रमण विरोधी कारवाई केली आणि बाजार भरू दिला नाही. तथा परिसरातील बिर्याणी दूकानावर कारवाई करून एफआयअर दाखल कारण्यात येत आहे.

यापुढे या मुख्य रस्त्यावर कोणताही आठवडी बाजार किंवा भाजीपाला विक्रेत्यांना बसू दिले जाणार नाही, अशी कडक ताकीद प्रशासनाकडून देण्यात आली आहे. मनपाच्या या धडक निर्णयामुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला असून धर्मपेठ झोनच्या कारवाईचे स्वागत केले आहे. सदर कारवाई आयुक्त मनपा नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर शहर, उपायुक्त वाहतुक, नागपूर यांच्या संयुक्तिक मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# आज आवतन घ्या, उद्या जेवायला या! सावरगावात शिंदे यांनी जपली बैलपोळ्याची परंपरा

### माजी आमदार स्व. सुनीलबाबू शिंदे यांचे सुपुत्र, माजी कृषी सभापतींनी केली सर्जा-राजाची खांदेशकणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
शेतीमध्ये आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर वाढला असला तरी शेतकऱ्यांचा खरा सखा असलेल्या बैलाचे महत्त्व आजही कायम आहे. वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या बैलपोळा सणाच्या पूर्वसंध्येला नरखेड तालुक्यातील सावरगाव येथे माजी आमदार स्व. सुनीलबाबू शिंदे यांचे सुपुत्र तथा जिल्हा परिषद नागपूरचे माजी कृषी सभापती यांनी पारंपरिक पद्धतीने बैलांची खांदशेकणी केली.



गुरुवारी, दि. १० रोजी बैलपोळा सण असल्याने बुधवारी सायंकाळी सावरगाव येथे खांदशेकणीचा पारंपरिक विधी पार पडला. यावेळी बैलांच्या खांद्याला तूप व हळद लावून प्रेमाने चोळण्यात आली. पळसाच्या पानाचा देठ दिव्यावर धरून त्याचा शेक बैलाच्या खांद्याला देण्यात आला. 'आज आवतन घ्या, उद्या जेवायला या, एक नमन गौरा-पार्वती, हर हर महादेव' अशी साद घालत बैलांना पोळ्याच्या दिवशी जेवणाचे आमंत्रण देण्यात आले.

बैल हा केवळ शेतीचे काम करणारा पशू नसून शेतकऱ्याच्या कुटुंबाचा एक घटक मानला जातो. नांगरणी, वखरणी, पेरणीपासून शेतीच्या विविध कामांमध्ये बैलजोडी शेतकऱ्यासोबत वर्षभर राबते. त्यामुळे पोळा हा बैलांच्या श्रमांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा सण आहे. खांदशेकणीच्या दिवशी 'कासऱ्याने आवरलं, तुतारीने ढोसलं, राग नको मानू रे बैला' असे म्हणत वर्षभर घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवून बैलांची माफी मागण्याची परंपराही आजही ग्रामीण भागात जपली जाते.

शिदे यांनी स्वतः बैलांची खांदशेकणी करून ग्रामीण संस्कृती, शेती आणि शेतकऱ्यांच्या परंपरेशी असलेली नाळ कायम असल्याचा संदेश दिला. त्यांच्या या उपक्रमातून नव्या पिढीनेही बैलांच्या श्रमांचा आणि शेतकऱ्यांच्या कष्टांचा सन्मान करण्याची प्रेरणा घ्यावी, असा संदेश मिळाला.

पोळ्याच्या दिवशी बैलांना स्नान घालून रंगरंगोटी, आकर्षक झुली, घुंगरू व विविध अलंकारांनी सजविण्यात येणार असून, विधिवत पूजा करून त्यांना पुरणपोळी व विविध पदार्थांचा नैवेद्य दाखविला जाणार आहे. सावरगावसह नरखेड तालुक्यात पोळ्याचा उत्साह असून सर्जा-राजाच्या स्वागतासाठी गावागावांत जय्यत तयारी करण्यात आली आहे.

# प्रा. डॉ. नीता वानखेडे आयडॉल शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठीच्या प्राध्यापिका डॉ. नीता मिलिंद वानखेडे यांना जिल्हा परिषद नागपूरच्या वतीने शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते जिल्हा आयडॉल शिक्षक म्हणून पुरस्कृत करण्यात आले. महाराष्ट्र शासन आणि जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागातर्फ दरवर्षी शिक्षक दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना जिल्हा आडॉल शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले जाते. डॉ. नीता वानखेडे या मागील २१ वर्षापासून सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे. आपल्या सेवेदरम्यान त्यांनी अनेक शैक्षणिक नवोपक्रमात भाग घेऊन विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण दिले. लेखन,वाचन व उल्हास उपक्रमात भरीव कामगिरी करत अनेक ज्येष्ठ व निरक्षांना साक्षर केले.



उल्लास' उपक्रम हा केंद्र सरकारचा एक महत्त्वाचा आणि पथदर्शी कार्यक्रम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला 'नव भारत साक्षरता कार्यक्रम' म्हणतात. या उपक्रमांतर्गत शिक्षण चुकवलेल्या १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांना साक्षर व सक्षम बनविले जाते. डॉ. नीता वानखेडे यांनी नवभारत साक्षरता अभियाना अंतर्गत अनेकांना साक्षर बनविले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दहात, उप प्राचार्य व्ही बी वंजारी, पर्यवेक्षक प्राध्यापक एन डी. मेंढे व इतर सर्व शिक्षकांनी डॉ. नीता वानखेडे यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.


## कार्यालय ग्रामपंचायत अरोली

प.स. मौदा जिल्हा नागपूर

ई—निविदा सुचना सन २०२६—२०२७ (प्रथम वेळ)

ग्राम पंचायत **अरोली** प. स. **मौदा** जिल्हा नागपूर यांचे वतीने खालील कामाची **बि—१** दोन लिफाफा पध्दतीने ई—निविदा जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर जिल्हा वार्षीक नागरी सुविधा योजना अंतर्गत मौजा अरोली सन २०२६—२०२७ या वर्षी **B1** पध्दतीनें योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडुन **प्रशासकीयमान्यतेच्या अधीन राहून** जिल्हा परिषद वेबसाईटवर http.mahatendars.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विवरण | अंदाज पत्रकीय किंमत (रू) | अनामत रक्कम (रू) १: | निविदा फी (रू) | कामाचा कालावधी | दरपत्रक विक्री व स्विकुत दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE ROAD AT GP AROLI PS MOUDA DIST NAGPUR UNDER SCHEME NAGARI SUVIDHA YOJNA IN YEAR 2024-2025 FORM SHRI TULSHIRAM GHODMARE HOUSE TO SHRI DHANRAJ MEHAR HOUSE IN YEAR 2026-2027 | 10,00,000.0 | 10,000 | 1000 | 06 Month | दिनांक १०/०९/२०२६ ला स. १०.०० वाजेपासुन ते दिनांक १७/०९/२०२६ ला सांय ०५.०० वाजेपर्यत |
| २ | CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE ROAD AT GP AROLI PS MOUDA DIST NAGPUR UNDER SCHEME NAGARI SUVIDHA YOJNA IN YEAR 2024-2025 FORM SHRI TEJRAM HAJARE HOUSE TO SHRI DIGAMBAR NARNVARE HOUSE IN YEAR 2026-2027 | 10,00,000.0 | 10,000 | 1000 | | |
| ३ | CONSTRUCTION OF CEMENT CONCRETE ROAD AT GP AROLI PS MOUDA DIST NAGPUR UNDER SCHEME NAGARI SUVIDHA YOJNA IN YEAR 2024-2025 FORM SHRI RAMAJI DHURVE HOUSE TO SHRI TARACHAND KHWALE HOUSE IN YEAR 2026-2027 | 15,00,000.0 | 15,000 | 1000 | | |

सरपंच
ग्राम पंचायत अरोली
प.स. मौदा जि.प. नागपूर

सचिव
ग्राम पंचायत अरोली
प.स. मौदा जि.प. नागपूर


थोडक्यात

## बोरी (घिवारी) व वाघबोडी शाळेतील विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स किटचे वाटप

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या क्रीडा व सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने गट ग्रामपंचायत बोरी (घिवारी) अंतर्गत येत असलेल्या बोरी (घिवारी) व वाघबोडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून स्पोर्ट्स किटचे वाटप करण्यात आले. यावर्षी शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी शाळेला केवळ एकच ड्रेस प्राप्त झाल्याचे सरपंच विशाल सेलोकर यांच्या निदर्शनास आले. विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि कोणताही विद्यार्थी केवळ साधनांच्या अभावामुळे मागे राहू नये, या विचारातून सरपंच विशाल सेलोकर यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त ड्रेस व स्पोर्ट्स किट उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला. त्यानुसार मंगळवार (ता. ८ सप्टेंबर) हा संकल्प प्रत्यक्षात साकारण्यात आला. या उपक्रमातून 'गाव छोटं असलं तरी विद्यार्थ्यांची स्वप्नं मोठी असली पाहिजेत' हा सकारात्मक संदेश देण्यात आला. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शिक्षण, क्रीडा, आरोग्य व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबविणाऱ्या सरपंच विशाल सेलोकर यांच्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

या कार्यक्रमास मौदा तालुक्याचे तहसीलदार दत्तात्रय निंबाळकर तसेच अरोली पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार सागर गोमासे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षण, शिस्त, क्रीडा आणि मेहनतीचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच खेळातही पुढे येऊन आपल्या गावाचे नाव मोठे करावे, असे आवाहन त्यांनी केले. तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या छोट्याशा गावातील विद्यार्थ्यांसाठी ग्रामपंचायतीने घेतलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून, सरपंच विशाल सेलोकर यांचा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्याचा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत उपसरपंच दिनेश पटले, सदस्या सुषमा राऊत, संगीता गभणे, शिक्षकवृंद प्रतेके, पठाले, समिती उपाध्यक्ष कैलास झलके,पोलिस पाटील अभिजित शेनवार, अंगणवाडी सेविका दामिनी तिजारे, मदतनीस प्रमिता मेश्राम, अंगणवाडी सेविका मीना पटले, प्रवीण भुते, नितेश ढेंगे, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'गाव लहान असले तरी स्वप्नं मोठी आहेत; त्या स्वप्नांना पंख देण्याचे काम ग्रामपंचायत सातत्याने करत राहील,' असा विश्वास सरपंच विशाल सेलोकर यांनी यावेळी व्यक्त केला.

## दोन मिनिटांत ५०० केशर आंब्यांची लागवड

### बेसूर येथे 'मँगो कप स्पर्धा ४.०'चा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
'डार्फ केटल मँगो कप स्पर्धा ४.०' अंतर्गत बेसूर येथे दोन मिनिटांत ५०० केशर आंब्यांची लागवड करून स्पर्धेचा जिल्ह्यातील पहिला उपक्रम सुरू करण्यात आला. एक एकर सार्वजनिक जागेवर हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या प्रयत्नातून आणि सप्रेम फाउंडेशनच्या माध्यमातून जिल्ह्यात प्रथमच ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. लागवडीसाठी ग्रामपंचायतीने पूर्वमशागत, खड्डे, संरक्षक कुंपण व सिंचनाची व्यवस्था केली, तर कोकणातून केशर आंब्यांची रोपे उपलब्ध करून देण्यात आली. बेसूरसह तास, पांजरेपार पुनर्वसन आणि नागतरोळी ग्रामपंचायतींनीही स्पर्धेत सहभाग घेतल्याची माहिती गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव यांनी दिली.

जिल्हा कृषी अधिकारी सुषमा मोरे, मग्रारोहयो कृषी अधिकारी प्रतीक्षा राणे व तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत एकाच वेळी ५०० रोपांची लागवड केली. सहाय्यक गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर भोगे, सप्रेम फाउंडेशनचे हर्षवर्धन बानोकार, सरपंच रवींद्र राऊत यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक व नागरिकांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

## गठई कामगारांना स्टॉल देण्यास गती द्यावी : महापौर निता ठाकरे यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
शहरात चर्मकार व गठई कामगारांना शहराच्या विविध ठिकाणी स्टॉल उपलब्ध करून देण्यासाठी आलेल्या अर्जांची छाननी करून संबंधितांना स्टॉल देण्याची कार्यवाही त्वरित पूर्ण करावी, असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना दिले. संत रविदास आश्रय योजनेअंतर्गत गठई कामगारांना शहरात उपलब्ध करून द्यावयाच्या योजनेच्या संदर्भात महापौर निता ठाकरे यांनी आज डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात बैठक घेतली. राज्य सरकारच्या शासन आदेशानुसार (जीआर) संत रविदास आश्रय योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत चर्मकार व गठई कामगारांना रस्त्याच्या कडेला दुकानासाठी स्टॉल उपलब्ध करून दिल्या जाते. या संदर्भात मनपाकडे काही प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा काही अर्जांवर अद्यापही निर्णय झाला नाही, असे निवेदन नगरसेवक योगेश पाचपोर व भैय्यासाहेब बिघाणे यांनी केले. मनपाकडे असलेल्या अर्जांवर तात्काळ निर्णय घ्यावा, तसेच अर्जात त्रुटी असल्यास त्या संदर्भात अर्जदाराला रितसर कळवावे त्याचप्रमाणे रितसर परवानगीने असलेल्या गठई कामगारांच्या स्टॉलवर अतिक्रमण विभागाने कारवाई करू नये, असेही निर्देश महापौर ठाकरे यांनी दिले.

# "मालक तुमी आत्महत्या करू नका" शेतमालकाला आर्त हाक देणाऱ्या बैलांचा मानाचा सण "बैलपोळा"

कृषिप्रधान संस्कृतीतील "जगाचा पोशिंदा" म्हणजे आपला शेतकरी. आणि त्या शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावुन ऊन, वारा, पावसात नेहमी त्याच्यासोबत चालणारा, राबणारा त्याचा सोबती म्हणजे "सर्जा-राजाची" देखणी बैल जोडी. त्या सर्जा-राजाचे म्हणजेच बैलांचे आभार व्यक्त करण्यासाठी, आभार मानण्यासाठी हा सण साजरा केला जातो. बैलपोळा हा सण साजरा करण्यामागे एक महत्वाचा उद्देश आहे तो म्हणजे मुक्या जनावरांप्रति आपल्या मनात असलेली कृतज्ञतेची भावना. ती निर्मळ भावना मनोभावे त्यांच्या चरणी अर्पण करण्याचा दिवस. महाराष्ट्रात

**मनीषा विशाल सोन्नेकर-सोनकांबळे (देगलूर)**

बैलपोळा अगदी थाटात साजरा करतात.

"बैलपोळा" हा सण म्हटला कि डोळ्यासमोर सर्वात आधी खेड्यातील सुंदर चित्र उभं राहतं. पहाटेपासून घरातील बायकांची पुरणपोळीच्या गोडधोड स्वयंपाकाची छान लगबग चाललेली असते. घरातील पुरुष मंडळी बैलांच्या सजावटीत व्यस्त असतात. लहानगी, चिमुकली लेकरं बैलांभोवती पिंगा घालण्यात दंग असतात. खेड्यापाड्यात बैलपोळा हा सण अतिशय उत्साहात, आनंदात साजरा केला जातो. या सणाच्या दिवशी खेड्यातील चित्र पाहण्याजोगे असतं. श्रावण अमावस्येला बैलपोळा सण साजरा केला जातो. पोळ्याच्या दिवशी बैलांना, अपार कष्ट करणाऱ्या त्यांच्या शरीराला शेतीच्या कामातून आराम दिला जातो.

शेतकरी आणि बैल यांच्या नात्यात एकमेकांप्रती असलेलं जीवापाड प्रेम, जिव्हाळा आणि अपार माया न सांगताच दिसून येते. आणि ते प्रेम पोळा या सणाला अजूनच बहरतं. सकाळपासूनच बैलांच्या सजावटीला आनंदाचं उधाण आलेलं असतं. बैलांना गावातील नदीवर अंघोळ घातली जाते. बैलांचे शिंग छान रंग देऊन रंगवले जातात, कपाळी



कुंकवाचा टिळा, गळ्यात फुलांच्या माळा, पायांमध्ये चाळ, घुंगरू, अंगावर सुंदर नक्षिकाम केलेलं झूल पांघरली जाते. संध्याकाळी बैलांची पूजा करुन बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घातला जातो. हजारो वर्षांपासून बैलं मानवासाठी शेतात अहोरात्र राबत आली आहेत. बैलांच्या कष्टानंच शेतात हिरवंगार पीक पिकतं.

आणि शेतकरी त्या पिकाचं हिरवंकंच सौंदर्य बैलाच्या डोळ्यात बघतो. शेतकऱ्याचं जगणं असतातंच ती बैलं. बैलांच्या अपार कष्टामुळेच शेतशिवारं बहरतात. वर्षातला केवळ एक दिवस बैलांना विश्रांती दिली जाते. पण त्या एका दिवसाच्या विश्रांतीने बैलांच्या मेहनतीचे, त्याच्या कष्टाचे पांग फेडता येत नाहीत. पण त्या एका दिवशी बैलांना पुजून शेतकऱ्याच्या मनाला जी शांतता मिळते ती शांतता कुठेतरी उपकार फेडत असल्याची भावना मनी फुलवत असते. बैलांचे रीन तर फेडताच येत नाहीत. शेतकऱ्याच्या कष्टाशिवाय शेतीला आणि बैलांशिवाय काळ्या भुईला कुठलाच पर्याय नाही. खरं तर पोळ्याच्या दिवशी बैलांच्या डोळ्यात एक आस असते, त्याचंही एक म्हणनं असतं.

शेतकऱ्याचं जगणं, हसणं, आयुष्य हे सगळं सर्जा-राजावर अवलंबून असतं. शेतकऱ्याला आणि बैलांना एकमेकांचं सुखः, दुःख खुप जवळून ओळखता येतं. ते दोघेही आयुष्यभर एकमेकांवरच अवलंबून असतात. आपला मालक लयी काबाड कष्ट करतोय, तरिबी मालकाच्या मालाला चांगला भाव मिळत नाही. म्हणून आपला मालक आत्महत्या करतोय. हे त्या बैलांना खुप चांगलं समजतं. ती बैलं डोळ्यात आसवं आणून मालकाची समजूत काढत असतात. या दोघांच्या नात्यातील प्रेम, दोघं मिळून करत असलेले कष्ट सारं रान पीकवितात.

"मालक, तुमीच दरवर्षी पोळ्याला आम्हाला सजवा, सारं गाव फिरवा, औत, नांगराची पूजा करा, दरवर्षी पुरणपोळीचा गोड नैवेद्याचा घास आम्हाला तुम्हीच भरवा. पोळा सणादिवशी बैलं आपल्या मालकाला आर्त हाक देत असतात. कारण, आपला मालक कर्जाच्या फिकीरीत बुडालेला आहे. ते बैलांना चांगलं ठाऊक असतं. पोळा हा सण केवळ एक सण नाही. तर शेतकरी आणि बैल या दोघांच्या नात्याची वीण घट्ट करणारा सण आहे.

सर्व शेतकरी बांधवांना "बैलपोळा" सणाच्या खुप साऱ्या शुभेच्छा.....!

- ९९६००२८८९९

## पोळा

**सुधाकर रा. जाधव**



पोळा, बैलांचा सण! आपल्या शेतीप्रधान देशात, शेतकऱ्यांचा मित्र बैल! अशा या अती कष्ट'ळू प्राण्याचा आरामाचा एक दिवस म्हणजे पोळा.

तसे पाहिले तर पोळ्याच्या आदल्या दिवशी पासूनच बैलाच्या मानेवर जु ठेवल्या जात नाही, कारण हा खालमानीचा दिवस असतो. पोळ्याच्या दिवशी सकाळी बैलाची अंघोळ घालून, पूजा केली जाते. त्याला पुराण पोळीचा नैवेद्य चारला जातो. नंतर त्याला सजवले जाते. त्याचा साज म्हणजे अंगावर झुल, गळ्यात घुंगरू अथवा घंटी बांधली जाते. शिंगाणा रंगाविले जाते. या दिवशी बैल कसा ताजातवाना दिसतो.

नंतर सायंकाळच्या पूर्वी बैलांचा पोळा भरतो. गावाच्या वेशीवर, मारोतीच्या पारावर लांबच लांब तोरण बांधले जाते. या तोरणाखाली शेतकरी आपली बैलजोडी आणून उभी करतात. तोरणाखाली एका रांगेत शेकडो बैल, रंगीबेरंगी सजावटीत उभे असतात. तो देखावा फार मनोहरी असतो. बैलांनाप्रमाणे त्यांचे शेतकरी मालक सुद्धा नवीन परिधानात ऐटीत उभे असतात.

थोड्या वेळाने पाटलाच्या मानाच्या बैलांचे वाजत गाजत आगमन होते. त्यांच्याकरवी तोरण तोडून पोळा फुटल्याची घोषणा होताच, सर्वजण आपापल्या बैलांना घेऊन माघारी फिरतात. यावेळचे दृश्य पाहण्याजोगे असते. जणू बैलांची शाळचं सुटली असे भासते.

पुन्हा बैलांना घरी नेऊन, औक्षवान करून गोडधोड खाऊ घालतात. नंतर गडी माणसं शेजारी पाजारी, नातेवाईक, ईस्टमित्रांच्या दारी बैलांना घेऊन जातात, पुरणाची पोळी मागतात. घर मालकीणबाई घरी आलेल्या बैलाची आनंदाने मनोभावे पूजन करून बैलाला पुराण पोळी खाऊ घालतात. व घेऊन येणाऱ्या गड्याच्या हातावर दक्षिणा ठेवतात. आशा रीतीने पोळा हा सण बैलांना तर आनंद घेऊन येतो, सोबतच शेतकरी, कामकरी मजुरांना सुद्धा आनंद देऊन जातो.

आजच्या आधुनिक युगात बैलांची जागा ट्रॅक्टर इत्यादी साधनाने घेतल्याने, घरोघरी आढळणारी बैल जोडी विलुप्त होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे पुढे पोळा हा सण इतिहास जमा होईल यात नवल नसावे. बैल पोळ्याच्या सर्वांना शुभेच्छा!

## उद्याच्या पिढीला पोळा पुस्तकातच वाचावा लागेल?

### यांत्रिकीकरणाच्या काळात शेतकरी आणि बैलांचे तुटत चाललेले नाते; पोळ्याची परंपरा जपण्याचे आव्हान

**सतिश तुळसकर उमरेड**

कधीकाळी गावातील प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात किमान एकतरी बैलजोडी असायची. बैलजोडी म्हणजे केवळ शेतीचे साधन नव्हते, तर ती शेतकऱ्याच्या कुटुंबाचा एक भाग असायची. बैलांसोबत शेतकऱ्याचे एक वेगळेच भावनिक नाते निर्माण झालेले असायचे.

मात्र काळ बदलला. शेतीचा खर्च वाढला आणि शेतीचे उत्पन्न मात्र त्या तुलनेत वाढले नाही. परिणामी अनेक शेतकऱ्यांना बैलजोडीचा खर्च परवडेनासा झाला. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी बैलांचे संगोपन, चारा-पाणी आणि देखभाल करणे अधिकच कठीण झाले.

त्यातच बैलजोडीसोबत औत हाकणारा अनुभवी गडी माणूस मिळणेही अवघड झाले आहे. त्यामुळे बैलजोडी खरेदी करून तिची वर्षभर जोपासना करण्यापेक्षा गरजेच्या वेळी ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतीची मशागत करून घेणे शेतकऱ्यांना अधिक सोयीचे आणि व्यवहार्य



वाटू लागले आहे. पूर्वी शेतकरी बैलांसोबत केवळ शेतातच नव्हे, तर दैनंदिन जीवनातही रमलेला असायचा. एखादा शेतकरी एकटाच बैलगाडीतून प्रवास करताना बैलांशी गप्पा मारत आपला वेळ घालवायचा. बैलांच्या हाका, त्यांच्या गळ्यातील घुंगरांचा नाद आणि बैलगाडीचा प्रवास हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग होता.

ट्रॅक्टरने शेतीचे काम वेगाने होते; मात्र त्याच्यासोबत ते भावनिक नाते निर्माण होत नाही. ट्रॅक्टर हे यंत्र आहे, तर बैल शेतकऱ्याचा सोबती होता. बैलजोडी असेल तर गोठ्यात एखादी गायही असायची. घरातील दूध, शेणखत आणि शेतीचे चक्र यामध्ये पशुधनाची महत्त्वाची भूमिका होती. आज मात्र अनेक घरांमधून गोठे रिकामे होत आहेत आणि पशुधनाऐवजी यंत्रांनी शेतीचा ताबा घेतला आहे.

यामुळेच आजचा पोळा हा केवळ बैलांना सजवण्याचा आणि त्यांची पूजा करण्याचा सण राहिलेला नाही. तो आपल्या ग्रामीण संस्कृतीची आठवण करून देणारा दिवस बनत चालला आहे. आज बैलजोड्या कमी होत आहेत, बैलगाड्या दुर्मिळ होत आहेत आणि बैलांशी जोडलेले शेतकऱ्यांचे भावनिक नातेही हळूहळू विरत आहे.

प्रश्न एवढाच आहे, ही परंपरा पुढच्या पिढीपर्यंत प्रत्यक्ष पोहोचणार की उद्याच्या मुलांना पोळा म्हणजे काय, हे इतिहासाच्या पुस्तकातून शिकावे लागणार?

यंत्रयुग आले म्हणून परंपरा संपायला नको. शेती आधुनिक व्हावी; मात्र तिच्या मातीशी जोडलेली संस्कृतीही जिवंत राहावी, हीच पोळ्याच्या निमित्ताने अपेक्षा.

## तान्हा (लाकडी बैल) पोळ्याला २३७ वर्षे पूर्ण नागपूरात सर्वात मोठा लाकडी बैल

### नागपुरकर भोसले परिवाराची अनोखी परंपरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरात पोळा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तान्हा पोळा भरवण्याची परंपरा वर्षानुवर्ष सुरु आहे. यंदा लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्यास २३७ वर्ष पूर्ण होत आहेत. भारत हा कृषीप्रधान देश असून भारतात सर्वत्र पोळा बैलांचा सण म्हणून साजरा केल्या जातो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळा या दिवशी लहान मुले लाकडी बैलांचा पोळा साजरा करतात. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा केला जात नाही. सन १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरु केला.



लहान बालगोपालांना बैलाचे महत्व कळावे. म्हणून लाकडी बैल (तान्हा) पोळ्याची सुरुवात केली. श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून मागविले व सर्व लहान मुलांना ते वाटण्यात आले. जिवंत बैला प्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून त्याला जिलेबी, फळं, आता चॉकलेट, बिस्कीट पुडे, अशा विविध वस्तूंनी तयार केलेले तोरण बांधून त्यामध्ये मुलांना उभे करून बैलांची पूजा करण्यात यायची.

पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकी चे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटण्यात यायचे. या प्रथेला २३७ वर्षे पूर्ण होत आहे. राजे मुधोजी महाराज भोंसले यांनी ही प्रथा आजही कायम ठेवली आहे. राजे मुधोजी महाराज भोंसले यांच्या वाड्यात सर्वात मोठा लाकडी बैल आहे. आज सुद्धा एवढा मोठा बैल भोंसले घराण्याकडे आहे.

मुधोजी राजेंचे निवासस्थान सिनियर भोंसला पॅलेस, महाल, नागपूर येथे हा बैल आहे. या लाकडी बैलांची उंची आठ फूट, लांबी सहा फूट असून या बैलांच्या पायात चांदीचा तोडा घातला आहे. ज्या पद्धतीने श्रीमंत राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) वाजत गाजत मिरवणूक काढायचे त्याच परंपरेला अनुसरून दरवर्षीप्रमाणे यावर्षी दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी, सायंकाळी ५ वाजता. मोठ्या प्रमाणात मिरवणूक निघणार. २३७ वर्षानंतर आजही सुद्धा ही प्रथा राजे मुधोजी महाराज भोंसले यांनी नियमीत ठेवली व यापुढेही सुद्धा ही प्रथा चालू राहील असे मत महाराजांनी व्यक्त केलेले आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थिनी सरसावल्या; महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा धडाका

### 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश, रोपांच्या संगोपनाचीही घेतली जबाबदारी

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

सावरगाव येथील राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकारातून वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, बदलते हवामान आणि वाढते प्रदूषण यामुळे वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित होत असताना विद्यार्थिनींनी पुढाकार घेत महाविद्यालय परिसरात विविध वृक्षांची लागवड केली. झाडे लावा, झाडे जगवाचा संदेश देत पर्यावरण रक्षणाचा जागर करण्यात आला.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय करकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्राध्यापकांसह राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रम अधिकारी डॉ. रंजना लांजेवार, डॉ. चंद्रशेखर क्षीरसागर, डॉ. रेवाराम मालखेडे, डॉ. सिद्धार्थ पाटील, प्रा. शेख, प्रा. निंबुळकर, विजय गांजरे व सुरेश बोरडे यांनी वृक्षारोपण करून विद्यार्थिनींचा उत्साह वाढविला.

वृक्षारोपण म्हणजे केवळ रोप लावून फोटो काढणे नव्हे, तर त्या रोपाचे मोठ्या झाडात रूपांतर होईपर्यंत त्याची निगा राखणे ही खरी पर्यावरणसेवा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थिनींनी लावलेल्या प्रत्येक रोपाची नियमित देखभाल करण्याचा संकल्प केला. वृक्षांमुळे स्वच्छ हवा, सावली, तापमान नियंत्रण, जैवविविधतेचे संवर्धन तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होत असल्याने अधिकाधिक नागरिकांनी वृक्षलागवडीसोबत वृक्षसंवर्धनालाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. वृक्षारोपणाच्या या उपक्रमामुळे महाविद्यालय परिसरात हिरवाई वाढण्यासोबतच विद्यार्थिनींमध्ये पर्यावरण रक्षणाची सकारात्मक भावना निर्माण झाली.

थोडक्यात

# भिवापूर महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व एम.ए. प्रथम वर्षाच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी ८ सप्टेंबर रोजी स्वागत व परिचय समारंभ झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जोबी जॉर्ज होते. यावेळी कला शाखा प्रभारी डॉ. सुनील शिंदे, वाणिज्य प्रभारी डॉ. अनिता महावादीवार, विज्ञान प्रभारी डॉ. अश्विनी कडू व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. धम्मदीप सहारे उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा २०२६ चा डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्ण पदकाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जॉर्ज यांचा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिस्त, अभ्यासक्रम, सुविधा व आगामी उपक्रमांची माहिती देत स्वागत केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मनोगत व कविता सादर केल्या. प्रास्ताविक प्रा. धम्मदीप सहारे, संचालन समीर मोहनकर यांनी केले. आभार संजना मडावी हिने मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सुमारे २५० विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रारूप मतदार याद्या मतदान केंद्रांवर उपलब्ध

## मतदारांनी नोंदी तपासून आवश्यक दुरुस्ती करून घेण्याचे तहसीलदार संजय राठोड यांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

उमरेड विधानसभा मतदारसंघाअंतर्गत भिवापूर तालुक्यातील मतदारांच्या नोंदी तपासणीसाठी प्रारूप मतदार याद्या संबंधित मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तालुक्यातील एकूण ९६ यादी भागांच्या प्रारूप मतदार याद्या मतदारांच्या पाहणीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. यासोबतच ASDD मतदार याद्या, पडताळणी न झालेल्या मतदारांची यादी तसेच तांत्रिक त्रुटी असलेल्या मतदारांच्या नोंदींचा तपशील संबंधित मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे मतदारांनी आपल्या मतदार नोंदीमध्ये नाव, पत्ता, वय तसेच इतर तपशील योग्य आहेत किंवा नाहीत, याची प्रत्यक्ष पाहणी करून खात्री करावी.

मतदार यादीतील नोंदीमध्ये काही विसंगती आढळल्यास संबंधित प्रक्रिया पूर्ण करून आवश्यक ती दुरुस्ती करून घेण्याची संधी मतदारांना मिळणार आहे. त्यामुळे मतदारांनी केवळ निवडणुकीच्या वेळी मतदानाचा हक्क बजावण्यापुरते मर्यादित न राहता, आपले नाव मतदार यादीत योग्य पद्धतीने नोंदले आहे की नाही, याची वेळोवेळी खात्री करणे आवश्यक आहे. ५१-उमरेड विधानसभा मतदारसंघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा भिवापूरचे तहसीलदार संजय राठोड यांनी तालुक्यातील सर्व मतदारांनी संबंधित मतदान केंद्रावर जाऊन मतदार यादीतील आपली नोंद तपासून घ्यावी, असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# पारशिवनी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत राष्ट्रीय आदर्श विद्यालयाचा दबदबा



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

पारशिवनी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा अंतर्गत ७ व ८ सप्टेंबरला राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवेगाव खैरी येथे कबड्डी स्पर्धा पार पडल्या. राष्ट्रीय आदर्शच्या खेळाडूंनी शिस्त, चिकाटी, धैर्य, चपळता आणि एकजुटीचा अवलंब करीत १७ वर्षीय मुलींचा संघ, १४ वर्षीय मुलींचा संघ, १४ वर्षे मुलांचा संघ आणि १९ वर्षीय मुलांच्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळवून तालुक्यातून विजेतेपद पटकावले. यावेळी आयुषी पंधराम, हर्षु पिल्लारे, अश्रुता भोयर, आभा भरदिया, मानवी सलामे, प्रीती इनवाते, अंजली आंबाडारे, जिया राऊत, खुशी राऊत, गौरी मेश्राम, त्रिवेणी सावरकर, त्रिशा सावरकर, मैना मैंद, पूर्वी कोहळे, आर्या कोहळे, लावण्या सिंदराम सुजाता पनवारे, अनिकेत सहारे, सोहम कंगाली, प्रज्वल खंडाते, तनवीर पिल्लारे, शौर्य सोनटक्के, अंशुल कुसराम, अन्वेष दुनेदार, सारंग भलावी, साहिल नराटे, दीपांशू पंधराम, रोहित मुंगभाते, विपीन मारबते, आनंद नैताम, प्रीतम ढोरे आयुष पंधराम, एकांस सहारे या खेळाडूंनी विजयाचे श्रेय शाळेचे मुख्याध्यापक राजू बर्वे, मार्गदर्शक शिक्षक साक्षोधन कडबे, प्रशिक्षक मनीष राऊत, क्रीडा शिक्षक शैलेंद्र देशमुख, तालुका क्रीडा संयोजक रितेश मैंद, सतीश जुननकर, प्रा.अरविंद दुनेदार, दिलीप पवार, अमित मेश्राम आणि शाळेच्या समस्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिले. अतिशय दुर्गम व आदिवासी भागातील खेळाडूंनी कठोर परिश्रमातून प्राप्त केलेल्या यशाबद्दल परिसरातील पालक वगार्तून व सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून 'पेंच'मधील कामांची पाहणी

## मानव-वन्यजीव संघर्ष निवारणासह निसर्ग पर्यटनाच्या कामांचा आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल (८ रोजी) पेंच व्याघ्र प्रकल्पातील विविध क्षेत्रांना भेट देऊन मानव आणि वन्यजीव संघर्ष निवारणाच्या उपाययोजनांसह निसर्ग पर्यटनाच्या कामांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे त्यांनी विविध उपाययोजना करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले.



या पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी मानव आणि वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच संपर्क नेटवर्कवर चालणाऱ्या छायाचित्र सापळ्यांची संख्या वाढवणे, अतिसंवेदनशील क्षेत्रे निश्चित करणे, घाणेरी वनस्पतीचे निर्मूलन, कुरण विकास, संरक्षक तारेच्या जाळ्या बसवणे, सुसज्ज वन्यजीव रुग्णवाहिका उपलब्ध करणे आणि प्राथमिक प्रतिसाद पथकाच्या सदस्यांच्या मानधनाचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

त्यानंतर आशीर्वाद यांनी तोतलाडोह जलाशयातील पाणीसाठ्याची तपासणी केली. त्याचप्रमाणे सिल्लारी येथील अमलतास पर्यटन संकुलात वन कर्मचारी, स्थानिक नागरिक, प्राथमिक प्रतिसाद पथकाचे सदस्य आणि पोलीस पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

पूर्व पेंच परिक्षेत्रातील कक्ष क्रमांक ५६२ मधील कुरण विकासकामांसह घोटी व मौदी गावालगतच्या वनक्षेत्राची त्यांनी यावेळी पाहणी करताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दाहोदा येथील जय सेवा आश्रमशाळेतील सुविधांची माहिती घेतली व आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. चोरबहुली पर्यटन प्रवेशद्वारावरील कामांची तपासणी करताना निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने प्रस्ताव तयार करण्याचे आदेश त्यांनी संबंधितांना दिले.

उपसंचालक अक्षय गजभिये, उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, तहसीलदार रमेश कोडपे, अपर तहसीलदार पूनम कदम, वनपरिक्षेत्र अधिकारी निशिकांत कापगते आणि वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे तसेच संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# रामटेक येथे तान्हा पोळ्यासाठी लाकडी बैल सज्ज

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक :** विदर्भातील प्रसिद्ध तान्हा पोळ्यानिमित्त रामटेक येथील प्रसिद्ध काष्ठशिल्पकार दिनेश मथुरे यांनी लहान मुलांसाठी तयार केलेले आकर्षक आणि सुबक लाकडी नंदी बैल हे संपूर्ण रामटेक शहरात आणि परिसरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले आहेत. वर्षभर राब - राब राबून देशाला खादाण्य पुरवीणारा बळीराजा. शेतकऱ्यांचा पोळा हा अत्यंत महत्वाचा सण असतो.या सणाला बळीराजा आपल्या पोशिंदया बैलाला सजवून त्याची पूजा करतो. पोळा म्हटला कि," शेतकरी आणि बैलांसाठी वर्षभरातला सर्वात महत्वाचा दिवस असतो. "असा हा शेतकरीय प्रिय पोळा हा सण दारावरती आलेला आहे. बैल पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी लहान मुलांसाठी तान्हापोळा..हा बैलपोळा इतकाच महत्वाचा असतो.



**परंपरेची जपणूक:** विदर्भात मुख्य पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी लहान मुलांसाठी 'तान्हा पोळा' साजरा करण्याची जुनी परंपरा आहे. या दिवशी लहान मुले लाकडी बैलांची मिरवणूक काढतात आणि सण साजरा करतात. चिमुकल्यांना लहानपणापासूनच शेती आणि बैलांची ओळख व्हावी, हा यामागील मुख्य उद्देश असतो.असे ओमप्रकाश मथुरे, सुरेश मथुरे, दिलीप मथुरे, देवा हिंगे, मनिष साकोरे, बाबा सोनवणे या कारागीरानी यावेळी सांगितले आहे.

**कलेचे कौतुक:** दिनेश मथुरे यांनी आपल्या हातांनी कोरून बनवलेले हे लाकडी बैल पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी रामटेक तालुक्यातील नागरिकांची "बाबा फर्निचर, लकडा मार्केट, रामटेक येथे मोठी गर्दी होत आहे. वाढत्या महागाईमुळे लाकूड आणि रंगांचे साहित्य महाग झाले असले, तरी या कलाकारांनी आपली परंपरा आणि व्यवसाय मोठ्या उत्साहाने जिवंत ठेवला आहे.

# खापरखेड्यात शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांना एनएसयुआयचे साहिल गिहे यांचा संतप्त सवाल

## सरकारी शाळांची दुरवस्था आणि परीक्षाफुटीवरून सरकारचा जाहीर निषेध

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांच्या खापरखेड्यातील जिल्हा परिषद शाळा, चणकापूर येथील भेटीदरम्यान एक महत्त्वाची घटना घडली. राज्यातील बंद पडत चाललेल्या सरकारी शाळा, त्यांची अत्यंत दयनीय झालेली दैनंदिन अवस्था आणि राज्यामध्ये सातत्याने होणाऱ्या परीक्षाफुटीच्या (पेपर लीक) घटनांबाबत एनएसयुआय (ठरवक) महाराष्ट्र प्रदेश सचिव साहिल क्रिष्णा गिहे यांनी



शिक्षण मंत्र्यांना थेट जाब विचारला. विद्यार्थ्यांच्या मूलभूत आणि ज्वलंत प्रश्नांवर मंत्र्यांना घेरून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवर रोखठोक भाष्य करण्यात आले.

चणकापूर येथील जि.प. शाळेला भेट देण्यासाठी आलेल्या शिक्षण मंत्र्यांसमोर ग्रामीण भागातील शाळांची बिकट वास्तव्यता आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या परीक्षाफुटीच्या प्रकारांवर शासनाचे मौन क्यों, असा सज्जड सवाल साहिल गिहे यांनी केला. शिक्षण क्षेत्रातील या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याबद्दल एनएसयुआयच्या वतीने शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे व महाराष्ट्र सरकारचा जाहीर निषेध तीव्र शब्दांत नोंदवण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी, दर्जेदार शिक्षणासाठी आणि पारदर्शक परीक्षा प्रक्रियेसाठी हा लढा असाच सुरू राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला असून, शासनाने शिक्षण क्षेत्रातील ढासळत्या स्थितीकडे तात्काळ लक्ष न दिल्यास याहून तीव्र आंदोलने करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# १९ वर्षाच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल

## सेवकराम रहांगडाले यांना जिल्हा परिषद गोंदियाचा आदर्श शिक्षक पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा देणारे जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा कोटजमुरा, पंचायत समिती सालेकसा येथील पदवीधर शिक्षक सेवकराम धनलाल रहांगडाले यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत सन २०२६ चा जिल्हा परिषद गोंदिया आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.




रहांगडाले यांनी आपल्या १९ वर्षांच्या सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा विजयनगर येथे कार्यरत असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली सागर किशोर विश्वास या विद्यार्थ्याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली. सन २००७ ते २०१४ या कालावधीत त्यांनी कार्यरत असताना २५ हून अधिक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेसाठी निवड घडवून आणली. गडचिरोलीसारख्या दुर्गम व नक्षलग्रस्त भागात त्यांनी केलेले शैक्षणिक कार्य विशेष उल्लेखनीय ठरले.

### गावची शाळा, आमची शाळा उपक्रमात तालुक्यात द्वितीय क्रमांक

सन २०१४ मध्ये बदलीने स्वजिल्ह्यात आल्यानंतर जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा गौरनगर, पंचायत समिती अजुर्नी मोर येथे त्यांनी सेवा बजावली. गावची शाळा, आमची शाळा, या उपक्रमांतर्गत त्यांच्या प्रयत्नांमुळे शाळेला तालुकास्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला.

सन २०१६ मध्ये विषय शिक्षक म्हणून जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा हलबीटोला, पंचायत समिती सालेकसा येथे रुजू झाल्यानंतरही त्यांच्या कार्याची यशस्वी घोडदौड सुरू राहिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमन कवलचंद दसरिया हा विद्यार्थी पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम आला. सन २०१६ ते २०२४ या कालावधीत ३५ हून अधिक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली.

याच काळात जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात प्राथमिक मुलींच्या खो-खो संघाने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला. शिक्षकवृंद व ग्रामस्थांच्या सहकार्याने त्यांनी शाळेची पटसंख्या ६० वरून १०० पर्यंत वाढविण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### कोटजमुरा शाळेतही यशाची परंपरा कायम

सन २०२४ मध्ये जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा कोटजमुरा, केंद्र झालिया येथे बदली झाल्यानंतरही रहांगडाले यांनी विद्यार्थ्यांसाठी मेहनत घेणे सुरूच ठेवले. सन २०२६ च्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत परी सुरेंद्र नागपुरे आणि राज चंद्रकिशोर भंडारी यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला. तसेच शाळेतील ८ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली. अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२६ मध्ये प्राथमिक मुलींच्या गायन स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविण्यातही त्यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा राहिला.

### नवोदय जागृती अभियानातून विद्यार्थ्यांना नवी दिशा

नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आलोक सेवा संघाद्वारे संचालित नवोदय जागृती अभियान अंतर्गत सालेकसा तालुक्यात नवोदय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनातून ८ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली.

सध्या नवनियुक्त केंद्रप्रमुख अमित घावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद हायस्कूल कावराबांध येथे मिशन नवोदय उपक्रम सुरू असून झालिया केंद्रातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी नवोदय प्रवेश परीक्षेचे अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग घेण्यात येत आहेत. या उपक्रमातही रहांगडाले सक्रिय योगदान देत आहेत.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीपासून शाळेची पटसंख्या वाढविणे, शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेतील यश, क्रीडा-सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांपर्यंत तब्बल १९ वर्षांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सेवकराम रहांगडाले यांना जिल्हा परिषद गोंदियाचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याने शिक्षण क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# 'मारबत महोत्सवाच्या' अनुषंगाने दोन दिवसीय भव्य छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनी आजपासून

## नागरिकांना जुने फोटो पाठविण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरची पारंपारिक आणि ऐतिहासिक ओळख असणारी 'मारबत' आता केवळ शहरापुरती मर्यादित न राहता देशभरात पोहोचली आहे. काळी व पिवळी मारबत या पारंपरिक नावाने सुरू झालेली ही परंपरा आज विविध स्वरूपांत साजरी केली जाते. मारबत महोत्सवच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने १० व ११ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, तळमजल्यावरील प्रदर्शन हॉल, येथे सकाळी १०:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत एका भव्य छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांतील मारबतीचे दुर्मिळ फोटो गोळा करून त्याचे सार्वजनिक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन व क्रीडा विशेष समिती सभापती श्रीमती दर्शनी धवड यांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन १० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

# पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरतीत हिंदी माध्यमाच्या उमेदवारांवर अन्याय?

## शैक्षणिक पात्रतेची फेरतपासणी करून न्याय देण्याची मागणी, हिंदी माध्यमातील रिक्त पदे जाहीर करून १००% भरतीचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांवर कथितपणे अन्याय होत असल्याचा आरोप करत हिंदी माध्यमाच्या ळअक्ळ उमेदवारांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.



निवेदनानुसार, काही उमेदवारांनी इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी अथवा अन्य माध्यमातून घेतले असले, तरी त्यांनी D.Ed./B.Ed. अभ्यासक्रम हिंदी माध्यमातून पूर्ण केला आहे. अशा उमेदवारांच्या हिंदी माध्यमातील शिक्षक पदासाठीच्या पात्रतेची फेरतपासणी करून त्यांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गोंदिया, नागपूर, पुणे, जळगाव, वर्धा, नाशिक, नवी मुंबई तसेच मुंबई महानगरपालिका क्षेत्रासह हिंदी भाषिक विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असलेल्या भागांमध्ये हिंदी माध्यमाच्या शिक्षकांची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हिंदी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त राहिल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका प्रशासनाने हिंदी माध्यमातील सर्व रिक्त पदांची माहिती तातडीने जाहीर करून उपलब्ध पदांवर १०० टक्के भरती करावी, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे. आगामी TAIT-4 परीक्षेत हिंदी भाषेचा समावेश करण्यात यावा, अशीही प्रमुख मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात हिंदी माध्यमाच्या शाळा व विद्यार्थी असल्याने हिंदी माध्यमाच्या उमेदवारांना त्यांच्या भाषेत परीक्षा देण्याची समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी माध्यमनिहाय पात्रता व नियम स्पष्टपणे पोर्टलवर प्रसिद्ध करावेत, तसेच उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेची निष्पक्ष फेरतपासणी करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. पात्र असूनही एकाही उमेदवारावर अन्याय होऊ नये. हिंदी माध्यमातील विद्यार्थ्यांनाही इतर माध्यमांप्रमाणे गुणवत्तापूर्ण शिक्षण व समान संधी मिळावी, अशी भूमिका हिंदी माध्यमाच्या ळअक्ळ उमेदवारांनी मांडली आहे. शासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन हिंदी माध्यमातील रिक्त पदांची माहिती जाहीर करावी, पात्र उमेदवारांची फेरतपासणी करावी आणि शिक्षक भरती प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून उमेदवारांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.